ज्योतिर्मय

साहित्याचे विद्यापीठ

Online Journal of Literature....

❑ पुणे ❑ वर्ष २ रे ❑ अंक २१३ वा ❑ भारतीय सौर दिनांक २२ आश्विन शके १९४८, शुक्रवार दि.१६ ऑक्टोंबर २०२६ ❑ पाने ६ ❑ मूल्य:निशुल्क (खासगी वितरणासाठी)

विशेष लेख...

स्त्री जन्म... केवळ छळासाठी?

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय 🕮 साहित्य

स्त्रियांवर होणारे वाढते अत्याचार बघता एक प्रश्न नेहमी समोर येतो तो म्हणजे स्त्रियांचा जन्म केवळ अत्याचार करण्यासाठी झाला का?

समाजात लहान मुली, विवाहित महिला आणि वृद्ध स्त्रियांवर होणारे वाढते अत्याचार ही अत्यंत गंभीर, अस्वस्थ करणारी आणि चिंताजनक समस्या आहे. वय किंवा सामाजिक स्थिती कोणतीही असो, महिलांविरोधातील हिंसेचा हा वाढता आलेख चिंतेचा विषय बनला आहे.

स्त्री जन्माच्या वाट्याला येणारे दुःख, भेदभावाची वागणूक आणि छळ ही आपल्या समाजातील एक अत्यंत गंभीर आणि वेदनादायी वस्तुस्थिती आहे. जेव्हा एखादी स्त्री किंवा व्यक्ती अत्यंत कठीण मानसिक आणि शारीरिक त्रासातून जाते, तेव्हा मनातून असा उद्विग्न प्रश्न येणे स्वाभाविक आहे. परंतु, स्त्रीचे अस्तित्व केवळ छळ सहन करण्यासाठी नसून ते स्वाभिमान, कर्तृत्व आणि परिवर्तनाचे प्रतीक आहे.

स्त्री जन्म केवळ छळासाठी नक्कीच नसतो. हा प्रश्न मनातील खूप मोठी वेदना, अगतिकता आणि सभोवतालच्या परिस्थितीबद्दलची चीड व्यक्त करतो. जेव्हा समाजात किंवा एखाद्याच्या वैयक्तिक आयुष्यात सतत अन्याय, भेदभाव किंवा मानसिक-शारीरिक त्रास सहन करावा लागतो, तेव्हा असा विचार येणे अगदी साहजिक आहे.

पण इतिहासापासून आजपर्यंत आपण पाहिले तर स्त्रियांनी केवळ छळ सोसलेला नाही, तर त्यांनी प्रत्येक क्षेत्रात स्वतःचे अस्तित्व आणि कर्तृत्व सिद्ध केले आहे.

अंधश्रद्धेपोटी मुलाने आपल्या वृद्ध आईची विहिरीत ढकलून हत्या केल्याची धक्कादायक घटना तेलंगणा राज्यातील करीमनगर येथे घडली आहे. या प्रकरणी पोलिसांनी तब्बल ५ महिन्यांनंतर छडा लावला असून ही घटना ऑगस्ट २०२६ मध्ये उघडकीस आली होती.

घरात कोणाचा मृत्यू झाल्यास ते घर कायमचे सोडावे लागेल या अंधश्रद्धेमुळे आजारी आईला घरात मरण येऊ नये, म्हणून मुलांनी तिला विहिरीत ढकलून दिले.

आईचा मृत्यू घरात झाल्यास होणारे ''नुकसान'' टाळण्यासाठी मुलांनी हा संपूर्ण प्रकार केवळ एक अपघात किंवा आत्महत्या असल्याचे भासवण्याचा प्रयत्न केला होता.

महिला अत्याचार अशिक्षितांकडून होतो असे नाही तर सुशिक्षितांकडून देखील अत्याचार होत आहे.उच्च शिक्षण घेतलेल्या मुलाने आपल्या आईची हत्या केली.अमरावती शहरातील नवसारी रिंग रोड परिसरातील एका अपार्टमेंटमध्ये ही घटना घडली. पुण्यातील एका कंपनीत इंजिनिअर म्हणून नोकरी करणाऱ्या आणि सध्या वर्क फ्रॉम होम करत असलेल्या एका व्यक्तीने आपल्या ६५ वर्षीय आईची गळा आवळून हत्या केली.

स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचारा चा आलेख कमी न होता तो आलेख सतत वाढत आहे.

चिमुरड्या मुलींवर होणारे लैंगिक अत्याचार (उदा. पास्को कायद्यांतर्गत येणारे गुन्हे) आणि कौटुंबिक छळ हे त्यांच्या मानसिक आणि शारीरिक आरोग्यावर आयुष्यभरासाठी खोल जखमा सोडतात.

हुंड्यासाठी होणारा छळ, घरगुती हिंसाचार, शारीरिक आणि मानसिक मारहाण, तसेच पतीने किंवा सासरच्या लोकांनी दिलेला त्रास या स्वरूपाचे अत्याचार विवाहानंतर मोठ्या प्रमाणात पाहायला मिळतात. शारीरिकदृष्ट्या कमजोर असलेल्या वृद्ध महिलांना मालमत्तेच्या वादातून किंवा केवळ ओझे समजून घरातून हाकलून देणे, त्यांना अन्न-औषधांपासून वंचित ठेवणे आणि मानसिक व शारीरिक छळ करणे अशा घटना घडतात.

समाजातील अजूनही असलेली पुरुषप्रधान आणि स्त्रियांना दुय्यम समजण्याची मानसिकता हिंसेला खतपाणी घालते.

इंटरनेट आणि सोशल मीडियाचा गैरवापर, तसेच नैतिक मूल्यांचा होत असलेला ऱ्हास यामुळे गुन्हेगारी प्रवृत्ती वाढत आहे.बऱ्याचदा प्रकरणांचा निकाल लागण्यास होणारा उशीर आणि पुराव्यांचा अभाव यामुळे गुन्हेगारांचे धाडस वाढते.

एकापाठोपाठ एक समोर येणाऱ्या अत्याचाराच्या घटनांमुळे स्त्रियांचा जन्म अत्याच्यारासाठीच झाला का असा विचार मनात येणे स्वाभाविक आहे, पण याचे उत्तर नाही असेच आहे. स्त्रियांचा जन्म अत्याचारासाठी झालेला नाही.

अत्याचाराचे मूळ स्त्रियांमध्ये नसून, समाजात शतकानुशतके रुजलेल्या पुरुषप्रधान मानसिकतेत आहे. स्त्रीला भोगवस्तू किंवा स्वतः पेक्षा दुय्यम समजण्याची काही विकृत लोकांची मानसिकता या गुन्ह्यांसाठी कारणीभूत आहे. हा स्त्रियांचा दोष नसून, समाजातील नैतिक अधःपतन आणि संस्कारांची कमतरता दर्शवतो.अनेकदा कठोर कायदे असूनही गुन्हेगारांना वेळेत आणि कडक शिक्षा होत नाही. न्यायाला होणारा उशीर किंवा कायदेशीर पळवाटांमुळे गुन्हेगारांचे धाडस वाढते. कायद्याचा धाक निर्माण न होणे हे वाढत्या गुन्ह्यांचे एक मुख्य कारण आहे.

आजची स्त्री केवळ सोसणारी राहिलेली नाही. ती शिक्षणाच्या, नोकरीच्या आणि स्वावलंबनाच्या जोरावर पुढे जात आहे. जेव्हा स्त्रिया अन्यायाविरुद्ध आवाज उठवतात, तेव्हा असे राजे-रजवाडे किंवा विकृत मानसिकतेचे लोक त्यांचा आवाज दाबण्याचा प्रयत्न करतात. वाढती आकडेवारी अनेकदा यावरूनही दिसते की, आता स्त्रिया गप्प न बसता पोलिसांत तक्रार नोंदवत आहेत, जी एक सकारात्मक बदलाची सुरुवात आहे.

थोडक्यात सांगायचे तर, दोष व्यवस्थेचा, विकृत मानसिकतेचा आणि कायदा सुव्यवस्थेचा आहे; स्त्री जन्माचा नाही. स्त्री ही निर्मितीचे, शक्तीचे आणि प्रगतीचे प्रतीक आहे. आज गरज आहे ती तिच्या सभोवतालची विकृती नष्ट करून तिला सुरक्षित जग देण्याची. स्त्रियांवर होणारे अत्याचार रोखण्यासाठ केवळ कायदे पुरेसे नाहीत, तर समाजात नैतिक मूल्यांची जपणूक करणे, गुन्हेगारांना कडक व जलद शिक्षा होणे आणि महिलांना जागरूक करणे तितकेच गरजेचे आहे.

स्त्रीचा जन्म हा छळ सोसण्यासाठी नाही, तर सन्मानाने जगण्यासाठी आणि स्वतःचे आयुष्य स्वतःच्या अटींवर घडवण्यासाठी आहे.

साहित्य संमेलन की दुष्काळ निवारण?

ज्योतिर्मय 🕮 साहित्य

महाराष्ट्राची साहित्यिक आणि सांस्कृतिक परंपरा अत्यंत समृद्ध आहे. दरवर्षी आयोजित करण्यात येणारे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन हा या परंपरेचा मानबिंदू आहे. देशभरातील साहित्यिक, विचारवंत, कवी, लेखक आणि साहित्यप्रेमी रसिक यांचा तो एक भव्य मेळावा असतो. मराठी भाषेच्या संवर्धनासाठी, साहित्याच्या अभिवृद्धीसाठी आणि नव्या विचारांच्या देवाणघेवाणीसाठी या संमेलनाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे.


यंदाचे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन जानेवारी २०२७ च्या शेवटच्या आठवड्यात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या प्रांगणात आयोजित करण्याचे नियोजन आहे. पूर्वी या संमेलनासाठी शासनाकडून पंचवीस लाख रुपयांचे अनुदान दिले जात असे. आता ही मदत एक कोटी रुपयांपर्यंत पोहोचली आहे. मराठी साहित्याच्या विकासासाठी शासनाने आर्थिक मदत करणे स्वागतार्हच आहे. मात्र, यंदाच्या संमेलनाच्या निमित्ताने एक महत्त्वाचा प्रश्न उपस्थित होतो.

यंदा पावसाने ओढ दिल्यामुळे १९७२ पेक्षाही मोठा दुष्काळ पडला आहे. राज्यातील अनेक भागांत दुष्काळाचे सावट गडद झाले आहे. पावसाअभावी शेतातील पिके वाळून गेली आहेत. शेतकरी बांधवांची पिके



वाळून गेल्यामुळे शेतकरी बांधव हवालदिल झाले आहेत. शेतकऱ्यांच्या डोळ्यांसमोर वर्षभराच्या कष्टांची राख होत आहे. जनावरांच्या चाऱ्याचा आणि पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनत आहे. गावोगावी पाण्याची टंचाई जाणवू लागली आहे. पुढील पावसाळ्यापर्यंत परिस्थिती अधिक बिकट होण्याची भीती आहे. अशा वेळी शासनासमोर सर्वांत मोठे आव्हान आहे ते म्हणजे जनतेला या संकटातून बाहेर काढणे.

एका बाजूला शेतकरी पाण्याच्या प्रत्येक थेंबासाठी संघर्ष करीत असताना दुसऱ्या बाजूला साहित्य संमेलनासाठी मोठ्या प्रमाणावर खर्च केला जाणार असेल, तर शासनाच्या प्राधान्यक्रमांचा



विचार करणे आवश्यक ठरते. साहित्य संमेलन महत्त्वाचे आहेच; परंतु तहानलेल्या माणसाला पाणी, जनावरांना चारा आणि संकटग्रस्त शेतकऱ्याला मदतीचा हात देणे ही आजची अधिक तातडीची गरज आहे, हे लक्षात घ्यावे लागेल.

म्हणूनच यंदाचे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन पुढे ढकलावे किंवा सध्याच्या परिस्थितीत रद्द करून त्यासाठी शासनाने मंजूर केलेले एक कोटी रुपयांचे अनुदान दुष्काळनिवारणासाठी वापरण्याचा विचार करावा. या रकमेतून पाणीपुरवठा, टँकरद्वारे पाणी उपलब्ध करून देणे, जनावरांसाठी चारा आणि इतर तातडीच्या मदतकार्यास हातभार लागू शकतो. अर्थात, प्रत्यक्ष मदत कोणत्या स्वरूपात करावी, हे संबंधित प्रशासनाने गरजेनुसार ठरवावे.

या भूमिकेचा अर्थ साहित्याचा किंवा साहित्यिकांचा अवमान करणे असा अजिबात नाही. उलट, साहित्य हे समाजाच्या सुख-दुःखांचे प्रतिबिंब असते. साहित्यिक आपल्या लेखणीतून शेतकऱ्यांच्या व्यथा, सामान्य माणसाचे संघर्ष आणि समाजातील विषमता प्रभावीपणे मांडत असतात. मग संकटाच्या काळात साहित्यिकांनी आपल्या संवेदनशीलतेचा प्रत्यय कृतीतून देणे अधिक महत्त्वाचे ठरणार नाही का? नेहमीप्रमाणे, साहित्य संमेलन पुढील वर्षी भरवता येईलच.

साहित्यिकांचे विचार, कविता, कथा आणि कादंबऱ्या यांचा प्रवास थांबणार नाही. परंतु आज संकटात सापडलेल्या शेतकऱ्याला आणि तहानलेल्या गावांना मदत मिळण्याची गरज पुढे ढकलता येणार नाही. शासनाचे एक कोटी रुपये दुष्काळग्रस्तांसाठी खर्च झाले, तर त्यातून निर्माण होणारा दिलासा हा समाजाच्या दृष्टीने मोलाचा ठरेल.

मराठी साहित्याची खरी ताकद केवळ शब्दांत नसते, तर त्या शब्दांमागील सामाजिक बांधिलकीत असते. आज साहित्याने समाजाचे दुःख समजून घेण्याबरोबरच त्याच्या निवारणासाठीही उभे राहण्याची गरज आहे. शेवटी एवढेच म्हणावेसे वाटते की,साहित्य संमेलन समाजासाठी असते; समाजातील माणसेच संकटात असतील, तर त्या संकटाकडे दुर्लक्ष करून संमेलनाचा उत्सव साजरा करण्यात कोणता आनंद मिळेल?

यंदा साहित्य संमेलनापेक्षा दुष्काळनिवारणाला प्राधान्य देऊन साहित्यिकांनी आणि शासनाने सामाजिक संवेदनशीलतेचा आदर्श निर्माण करावा. तहानलेल्या महाराष्ट्राला आज साहित्यिकांच्या शब्दांइतकीच माणुसकीच्या कृतीचीही गरज आहे हे नक्की.

स. भु. प्रशालेत वाचन प्रेरणा दिन

ज्योतिर्मय 🕮 साहित्य

छत्रपती संभाजीनगर : दिनांक १५ ऑक्टोंबर २०२६ डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त श्री सरस्वती भुवन प्रशालेत वर्ग कार्यक्रमांतर्गत वर्ग सहावीच्या वतीने वाचन प्रेरणा दिनाचा कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रशालेचे मुख्याध्यापक विश्वरूप निकुंभ, प्रमुख वक्ते भगवान कुऱ्हाडे, प्रमुख पाहुणे उपमुख्याध्यापक गिरीश देशमुख, पर्यवेक्षक विजय चपाईतकर, ज्येष्ठ शिक्षिका नीता पारगावकर आदी मान्यवर उपस्थित होते. सर्व मान्यवरांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन झाल्यानंतर पाण्याने दीप प्रज्वलित करण्यात आले . त्यावेळी विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या भित्तीपत्रकांचे मान्यवरांच्या हस्ते विमोचन करण्यात आले. ६ वी फ च्या विद्यार्थ्यांनी वर्ग कार्यक्रम निमित्त वाचन प्रेरणा दिनाचे औचित्य साधून नऊ पुस्तके प्रशालेस भेट दिली. विद्यार्थ्यांनी भरपूर वाचन करावे व आपल्या ज्ञानाचे भांडार वाढवण्याच्या दृष्टीने विद्यार्थ्यांच्या या कृतीचे सर्व मान्यवरांनी भरभरून कौतुक केले. सहावी फ ची कु. ईश्वरी लिमकर, यशवंत देवरे, कु. आराध्य म्हस्के या विद्यार्थ्यांनी वाचन प्रेरणा दिना निमित्त आपले विचार व डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जीवनावर प्रकाश टाकणारे भाषण केले. प्रमुख वक्ते भगवान कुऱ्हाडे यांनी विद्यार्थ्यांना वाचनाची गरज व महत्त्व अतिशय सोप्या भाषेमध्ये पटवून दिले, त्यावेळी प्रशालेतील ५ वी ते ७ वी च्या सर्व विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला. कार्यक्रमाचे अध्यक्ष विश्वरूप निकुंभ यांनी विद्यार्थ्याचे कौतुक केले व



विद्यार्थ्यांना '' वाचाल तर वाचाल ''या उक्तीचा अर्थ पटवून दिला, कार्यक्रमानंतर वर्ग सहावीच्या सर्व विद्यार्थ्यांना ग्रंथालयाच्या आदरणीय सौ. प्रमिला जाधव मॅडम यांनी ग्रंथालयातील पुस्तकांचे वाटप केले व वर्गवार सर्व विद्यार्थ्यांचे सामूहिक वाचन घेतले.

या संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ६ वी फ ची शिस्त प्रतिनिधी कु. शौर्या मोरे व कु. अवनी जोशी या विद्यार्थिनींनी केले तर आभार प्रदर्शन वर्ग प्रतिनिधी कु. संस्कृती चव्हाण हिने केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी वर्गातील श्लोक कुलकर्णी, संजीवनी भागवत, आर्यन तुपारे, युवराज कदम, मनस्वी खेकाळे, रिद्धी मिसाळ या विद्यार्थ्यांचे विशेष सहकार्य लाभले .

दुर्गा देवीची भक्ती कराच पण मातृ सेवा विसरू नका

ज्योतिर्मय 🕮 साहित्य

आई ! म्हणून नुसती शाब्दिक संवेदना देणे गरजेचे असले तरी मातृ त्वाने घेतलेल्या कष्टाची संघर्षाची जाणिव असणे खूप गरजेची बाब आहे. अर्थात आई म्हणवणाऱ्या स्त्रीची ही अपेक्षा आपल्या पाल्या कडून नसते. पण पुत्र किंवा पुत्री म्हणून हे आपले कर्तव्य आहे . वरवर माया अन् उपाशी नीज ग बया ! ही वृत्ती आत्मघात करणारी आहे. ह्यातून आपणच आपली फसगत करून घेतो. आई वरील माया, प्रेम, विश्वास. सेवा , केवळ तीचा अमृत महोत्सव किंवा सहस्त्र चंद्र दर्शन हे धार्मिक विधी , सोहळे करण्याने संपत नाही. ते करणे खूप गरजेचे असून मुलांचे ते कर्तृत्व आहे. किमान त्यामधून वात्सल्या चे दर्शन तरी होते . त्याचा सकारात्मक परिणाम होणे मात्र अपेक्षित आहे. त्याच प्रमाणे हाच सेवाभाव नित्याच्या आचरणात होणे मात्र आवश्यक बाब आहे. प्रतिकूल परिस्थिती मध्ये (वृद्धत्व)काळात आईच्या पाठीशी खंबीर पणे उभा राहिले पाहिजे. नैराश्यात तीच्या पंखात बळ दिले पाहिजे. ज्या



योगे तीच्या आयुष्याचा उत्तरार्ध, सुख समाधान आनंद संवादाने भरून तिचे मन समाधानाने फुलवून काढण्या साठी माळ्या ची भूमिका आनंदाने निभावली पाहिजे. हेच वास्तविक प्रत्येक आई वडिलांना अंतर्मना तून वृद्धापकाळी वाटत असते. मुलाना दुःख होऊ नये असे त्यांच्या स्वभावातच पेरलेले असते. पण प्रसंगी आपल्या देहबोलीतून इषारे देण्याचा प्रयत्न करीत असतात. ज्या मुलांना हे इषारे कळले आणि वळले तर ते समाधानाने श्वास सोडून आनंद क्षण ऊप भोगतात.

नवरात्राचा हा उत्सव आपण दरवर्षी भक्ती भावाने साजरा करतो. कारण दुर्गा ही मातृ स्वरूप असून सर्वभक्तांचे ती संकट निवारण करीत असते. तेव्हा नवरात्री निमित्त आपण या मातृ शक्तीला व आपल्या मातेला ओळखण्याची एकच मूल्ये धरून स्वीकार करणे गरजेचे आहे. धैर्य , आत्मविश्वास , दक्षता ह्या गोष्टी कायम स्वरूपी आपल्या आचरणात भक्ती भावाने आणणे खरी गरज आहे. हे ज्याला पटते त्याच्या जीवनात सदैव यश, आनंदुर्जादीप , तेवत राहिल्या शिवाय राहणार नाही कारण मातृ देवो भवः हे पाळण्याची आपल्या संस्कृतीची शिकवण अनादी कालापासून आलेली आहे, आणि पुढे अनंत काल टिकणार आहे. नवरात्रीच्या ह्या मंगलमय उत्सवातून हेच आपल शिकले पाहिजे आणि पुढच्या पिढीला तसेच मार्गदर्शन केले पाहिजे. ही वृत्ती केवळ आपल्या आई पुरती मर्यादीत नठेवता समाजातील पिडीत, गरजु, गरिब , दिव्यांग, शेतकरी, अनाथ, निराधार यांना सेवा देऊन सन्मान केल्यास आनंदाने सिमोलंघन होण्या सारखे होईल.

अशा प्रकारचे मनाला पोषक



वातावरण ठेवल्यास आनंदी जीवनाला समृद्धीची पालवी फुटेल पण हे समजून घेवून त्याप्रमाणे कृती मध्ये मात्र उतरविले पाहिजे. समाज सेवेतून उज्वल विचाराला चालना मिळते म्हणून ह्या नवरात्री उत्सवात स्त्रीला सन्मानीत करण्याला खूप महत्व आहे. त्याची सुरुवात स्वतःच्या आईच्या सेवेपासून सुखात करावी. घरातील कुमारिकेला योग्य स्थान देवून तिचे शिक्षण यशस्वीरित्या पूर्ण करण्याचा परिश्रम पूर्वक अट्टाहास धरला पाहिजे. पत्नीच्या विचाराला महत्व देण्याचे कसब पाळावे तरच समस्त शक्ती रुपाची उपासना पदरी पडेल. थोडक्यात आपली माणूसकीची वृत्ती जागृत ठेवून ती जपली म्हणजे देवीच्या रूपांची आरती केल्या सारखे होईल. कारण दुर्गामाते प्रमाणे आपली आईही ज्ञान, कर्म, आणि इच्छा ह्या तिन्ही शक्ती चे प्रतिकच आहे. म्हणून एक सांगावे वाटते कीं दुर्गा मातेची भक्ती, पुजा, कराच पण स्व मातृसेवा करण्याचे कधि विस्मरणात जाऊदेवू नका . हे ध्येय वर्तमानात पाळले तरच तुमच्या आयुष्याची जीवन बाग आनंदानी फ ुला फळानी बहरुन जाईल .

या देवि सर्व भूतेषु मातृ रूपेण संस्थिता । नमस्तस्यैः नमस्तस्यैः नमस्तस्यैः : नमो नमः ।।



जात्यावरच्या ओव्या.....

माय माऊलीची माया
नका जाऊ देवू वाया
सुख मागते बाळाच
तुझ्या कडे विठूराया ॥८९१॥

माय माऊलीची माया
हाक मारता बावरी
हुडकुन गोंजारते
तिचे लेकरू साजरी ॥८९२॥

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

मनोपनिषद अर्थात मनाचे श्लोक-भाग ८०

ज्योतिर्मय साहित्य

धरा श्रीवरा त्या हरा अंतराते ।
तरा दुस्तरा त्या परा सागराते ।
सरा वीसरा त्या भरा दुर्भराते ।
करा नीकरा त्या खरा मछराते ॥८०॥

अर्थ - हे मना, श्रीमहादेवांच्या अंतर्यामी वसलेल्या सीतापती श्रीरामांना आपल्या हृदयात धारण कर. श्रीरामांना अखंड हृदयी धारण करून पार करण्यास अतिशय कठीण असा संसाररूपी सागर तरून जा. जे कितीही भरले तरी अपूर्णच राहते अशा पोटाला (संसाराला) विसरून जा. मत्सराशी निग्रहपूर्वक झगडून साधुसंतांनी सांगितलेल्या मार्गाने जा.

(श्रीवरा - सीतापती श्रीराम / लक्ष्मीपती विष्णू, हरा अंतराते - महादेवांच्या अंतर्यामी वसलेल्या, दुस्तर - कठीण, परा - मोठा, सरा - अंश/छटा, दुर्भर - भरण्यास अतिशय कठीण, नीकरा - प्रयत्नपूर्वक/हट्टाने, खर - गाढव, मच्छराते - मत्सर)

विवेचन - या श्लोकाची रचना भाषिक दृष्टया फार सुंदर आहे. र या अक्षराची पुनरावृत्ती झाल्याने अनुप्रास अलंकार साधला गेला आहे. त्याशिवाय रचनेत सहजता आहे. श्रीवर म्हणजे भगवान विष्णू. श्री म्हणजे लक्ष्मी. राम हाही विष्णूचाच अवतार असल्याने येथे सीतापती राम असा देखील अर्थ घेता






येतो. अशा या भगवंताला आपल्या हृदयात प्रत्यक्ष महादेव धारण करतात. त्या भगवंताला आपणही आपल्या हृदयी धारण करावे. श्रीरामांची योग्यता किंवा महती एवढी थोर की प्रत्यक्ष देवाधिदेव महादेव त्यांना आपल्या हृदयात स्थान देतात. त्यांचे ध्यान करतात. त्या तुलनेत आपण तर अगदी सामान्य माणसे ! तेव्हा अशा या भगवंताला आपण देखील आपल्या हृदयात स्थान द्यावे.

समर्थ संसाराला संसार सागर म्हणतात. एक वेळ एखादी नदी पोहून पार करणे सोपे पण सागर पार करणे महाकठीण. हनुमंत सागर पार करून लंकेला पोहोचला होता. कारण त्याने हृदयात रामनाम धारण केले होते. रामनाम ही एक अशी नौका आहे की जी आपल्याला हा महाकठीण असलेला भवसागर पार करण्यासाठी साहाय्यभूत ठरते. जो या नौकेत बसला, तो हा भवसागर तरून गेला.

(क्रमशः)





श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

नामाचे सूक्ष्म स्वरूप

ज्योतिर्मय साहित्य

नुसते 'राम राम' म्हणून राम कसा भेटेल हा प्रश्न माणूस सहजच विचारतो, आणि त्याला दाखला म्हणून म्हणतो की, समजा एखादा मनुष्य 'नोकरी नोकरी' असा जप करीत खोलीत बसला, तर त्याला नोकरी मिळणे शक्य आहे का ? वरकरणी हा दाखला अगदी बेमालूम दिसतो खरा, पण थोडासा विचार केला, तर तो इथे मुळीच लागू पडत नाही, असे कळून येईल. जो दाखला द्यायचा, आणि ज्या बाबतीत तो द्यायचा, त्यांचे गुणधर्म सारखे असावे लागतात. 'रामनाम' आणि 'नोकरी' यांचे परिणाम एकमेकांविरूद्ध आहेत. 'राम राम' म्हणण्याचा शेवट रामप्राप्तीत म्हणजे स्वतःच्या विस्मरणात होत असतो; म्हणजे देहबुद्धीतून देहाच्या पलीकडे जाणे, म्हणजे स्थूलांतून सूक्ष्माच्या पलीकडे जाणे, हा ' राम राम ' म्हणण्याचा परिणाम. परंतु नोकरीचा प्रकार याच्या अगदी विरुद्ध आहे. मुळात नोकरी ही कल्पना सूक्ष्म आहे. नंतर, ती मिळावी म्हणून दहाजणांचे आर्जव करायचे, त्याच्यानंतर ती देणारा भेटायचा, आणि मग आपण ती नोकरी करायची. म्हणजे नोकरी या कल्पनेतून, सूक्ष्मातून, स्थूलात जाणे हा नोकरीचा प्रकार. पण 'राम राम' म्हणणे हा प्रकार स्थूलांतून सूक्ष्माच्याही पलीकडे जाण्याचा आहे. यावरून, नोकरीचा हा दाखला इथे लागू पडत नाही हे स्पष्ट होते. दुसरी गोष्ट म्हणजे 'नोकरी नोकरी' असा जप करून नोकरी मिळणे कठीण हे तर खरेच, पण 'राम राम' म्हणून राम मिळणे कसे सोपे, किंबहुना कसे हमखास शक्य आहे हे पहा. नोकरी म्हणजे मुळात कल्पना असून, ती प्रत्यक्षात आणण्याकरिता इतर अनेक गोष्टींची कशी जुळवाजुळव करावी लागते, हे आपण आत्ताच पाहिले. तसेच, घर बांधणे ही कल्पना; ती पुरी करून ते घर सर्व बाजूंनी सुखसोयीचे आगर व्हावे या हेतूने सर्व जिनसा पैदा करून त्यात आणून ठेवणे, म्हणजेच कल्पनेतून कृतीत येण्याचा प्रकार झाला. आता हे करणे किती कष्टाचे आणि अनिश्चीत आहे याचा अनुभव सर्वांना आहे. 'राम राम' म्हणण्याचे उद्दिष्ट, स्थूलांतून सूक्ष्माच्या पलीकडे जाणे हे आहे; म्हणजेच, अगदी सर्व बाजूंनी परिपूर्ण आणि भरलेले घर एकेक वस्तू फेकून देऊन रिकामे करण्यासारखे आहे. ही गोष्ट करण्याची इच्छा असल्यास कोणालाही सहज होण्यासारखी आहे. तेव्हा 'नोकरी नोकरी' म्हणून नोकरी मिळणे जितके कठीण, तितकेच 'राम राम' म्हणून राम मिळणे निश्चीत आहे. सबब 'राम राम' म्हणून राम कसा भेटेल अशी शंका न घेता 'राम राम' जपावे.

मनाच्या सर्व दुःखाला कारण देहबुद्धी आहे. ती जायला उपाय एकच: प्रेमाने भगवंताचे नामस्मरण करावे. त्याच्या योगाने सर्व मल जाईल. नामस्मरणच रामाची गाठ घालून देईल. चित्तात तशी तळमळ मात्र पाहिजे. 'मी' पणा टाकावा आणि परमात्म्याचे होऊन राहावे.

जो नाम घेतो त्याला देहाच्या सुखदुःखाची जाणीव राहणार नाही. तो आनंदात राहील.

***

लिंबूचे आयुर्वेदिक फायदे

ज्योतिर्मय साहित्य

लिंबात व्हिटॅमिन-सी चे प्रमाण खूप जास्त असते. हे शरिरासाठी अँटिऑक्सिडंट म्हणून कार्य करते, जे मुक्त रॅडिकल्सला तटस्थ करते. व्हिटॅमिन-सी मुळे हृदयविकार, पक्षाघात आणि कमी रक्तदाबाचा धोकाही कमी होतो. सरासरी आकाराच्या लिंबाच्या रसात ३१ पर्यंत व्हिटॅमिन-सी असते, तर प्रौढ व्यक्तीला दररोज ६५ ते ९० व्हिटॅमिन-सी आवश्यक असते.

वजन घटवण्यात मदत करतो : लिंबूत असलेले पॉलीफेनॉल अँटीऑक्सिडंटमध्ये वजन कमी करण्याचे गुणधर्म आहेत. लिंबूत असलेले अँटिऑक्सिडंट्स रक्तातील ग्लुकोजची पातळी कमी करून इन्सुलिन प्रतिरोधक क्षमता सुधारू शकतात. या दोन्ही गोष्टी टाईप-२ मधुमेहाचे मुख्य कारण मानल्या जातात.

त्वचा सुधारते : लिंबूत असलेले व्हिटॅमिन-सी हे त्वचेवरील सुरकुत्या कमी करते. तसेच, त्वचेचा एजिंग पासून (वृद्धत्वापासून) बचाव करते आणि उन्हामुळे होणाऱ्या नुकसानापासून त्वचेचे



रक्षण करते.

पचनक्षमता मजबूत होते : बद्धकोष्ठतेपासून आराम मिळावा यासाठी सकाळी लिंबू पाण्याचे सेवन करावे. कोमट पाण्यात लिंबू मिसळून प्यायल्याने पचनक्रिया सुधारते. लिंबू पाण्याने पचनक्रिया सुधारते.

संकलन -
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क - ९२ ७१ ६६९ ६६९

नैसर्गिक ब्रेथ फ्रेशनर : अनेक वेळा लसूण, कांदा किंवा मासे खाल्ल्यानंतर तोंडाला दुर्गंधी येते. लिंबू पाणी प्यायल्याने श्वासाच्या दुर्गंधीची समस्या दूर होते. तसेच लिंबू लाळ उत्तेजित करते.

मुतखड्याच्या आजारात मदत होते : लिंबात असलेले सायट्रिक ॲसिड मुतखड्याचा धोका कमी करू शकते. सायट्रिक ॲसिड मध्ये सायट्रेट नावाचे संयुग असते, जे लहान लहान मुतखड्याचे स्टोन्स फोडण्यास मदत करते.

ॲनिमियापासून बचाव करते : लोहाच्या कमतरतेमुळे होणारा अशक्तपणा म्हणजेच ॲनिमिया हा एक अतिशय सामान्य आजार आहे. जेव्हा एखाद्या व्यक्तीला अन्नात पुरेसे लोह मिळत नाही, तेव्हा याचा त्रास होतो. लिंबूत काही प्रमाणात लोह असते.

हृदयाला हेल्दी ठेवते : जर एक लिंबू संपूर्ण खाल्ले तर शरिराला ५२% व्हिटॅमिन-सी मिळू शकते. लिंबूपाणी प्यायल्याने व्हिटॅमिन-सी भरपूर प्रमाणात मिळते. व्हिटॅमिन-सी मुळे हृदयविकार आणि स्ट्रोक्सचा धोका कमी होतो. तसेच, लिंबूत असलेले फायबर आणि प्लांट कंपाऊंड देखील हृदयविकाराचा धोका कमी करण्यासाठी फायदेशीर ठरतात.



शरद ऋतू मध्ये येणाऱ्या अश्विन महिन्यातील, माता भगवतीच्या, वार्षिक महापूजा महोत्सवाला शारदीय नवरात्र म्हणतात. या नवरात्रीचे महत्त्व देवी भागवत या ग्रंथात तिसऱ्या स्कंधात आलेले आहे. व्यास शिष्य जन्मेजय हे महर्षींना या व्रताविषयी विचारतात.

जनमेजय उवाच
नवरात्रे तु सम्प्राप्ते किं कर्तव्यं द्विजोत्तम ।
विधानं विधिवद् ब्रूहि शरत्काले विशेषतः ॥ १ ॥

✍अर्थ :
"हे श्रेष्ठ ब्राह्मण श्रेष्ठा! नवरात्र प्राप्त झाल्यावर काय करावे? विशेषतः शरद् ऋतूमध्ये येणाऱ्या नवरात्राचे विधिविधान मला सांगा."
त्यावर महर्षी वेद व्यास म्हणतात,
व्यास उवाच :
नवरात्रव्रतं पुण्यं प्रवक्ष्यामि नृपोत्तम ।
शरत्काले विशेषेण कर्तव्यं व्रतमुत्तमम् ॥
त्यानंतर अत्यंत महत्त्वाचा श्लोक येतो :
वसन्ते च प्रकर्तव्यं तथैव प्रेमपूर्वकम् ।
द्वावृतू यमदंष्ट्राख्यौ नूनं सर्वजनेषु वै ॥ ४ ॥
शरद्वसन्तनामानौ दुर्गमौ प्राणिनामिह ।
तस्माद्यत्नादिदं कार्यं सर्वत्र शुभमिच्छता ॥५॥

✍अर्थ :
वसंत ऋतूतही हे नवरात्र प्रेमपूर्वक करावे. शरद् आणि वसंत हे दोन्ही ऋतू सर्व प्राणि मात्रा साठी "यमदंष्ट्रा" म्हणून ओळखले जातात. हे दोन्ही काल खंड प्राणि मात्रा साठी कठीण/संकट पूर्ण असल्यामुळे, ज्याला आपले कल्याण हवे आहे, त्याने प्रयत्नपूर्वक नवरात्र व्रत करावे.



📖 वाचन
"पुस्तक म्हणजे ज्ञानाचा अखंड झरा, वाचन म्हणजे विचारांना मिळणारा नवा किनारा!"
वाचन माणसाला समृद्ध करते, विचारांना दिशा देते आणि जीवनाला नवी दृष्टी देते. पुस्तकांच्या सहवासातून ज्ञानाचे क्षितिज विस्तारते, कल्पनाशक्तीला बळ मिळते आणि व्यक्तिमत्त्वाचा विकास होतो.

(हे माझे मत आहे पटले तर घ्यावे)



न्यायालयाची योग्य टिप्पणी

मित्रांनो आणि वाचकहो व समस्त बंधूभगिनीनो, येथे "लोकशाही" शासनव्यवस्था आहे. हे लोकाचे, लोकाकरता व लोकाकडून चाललेले राज्य!म्हणजे जिथे सरकार राज्य असो का केंद्र चुकेल, किंवा जनहिताची, हक्काची पायमल्ली होत असेल तर त्याला जाब विचारणे.. हेआपले कर्तव्यच आहे. तसेच वाममार्ग, भ्रष्टाचार, इ. चा अतिरेकी वापर, अवाजवी दर, लोकहिताचे रक्षण न करणे आणि आपलेच जर काम करत नसतील तर कार्यपालिका किंवा विधिमंडळ असो त्यांना आपण हक्काने जाब विचारणा केली पाहिजे. अशाच एका घटनेत (ती घटना ऋग्णालय व औषधी) याबाबत घडली..

दहापट जास्त एमआरपीने कर्करोगाची औषधी विकली जात होती. हे अमानुष शोषण व जनतेची दिशाभूल आहे. सामान्य जनतेच्या अडचणी, सत्य अधिकारी वर्गाला माहिती नाही काय?? ड्रग इन्स्पेक्टर, राज्य, केंद्र गुपचूप का ?? म्हणून अशा संस्थानी काम केले नाही तर न्यायालयात जाब विचारला जाईलच. या भ्रष्ट दुष्टचक्रात मध्यम, निम्न वर्ग पुरता भरडला जातो. यासाठी न्यायालयाने आवाज ऊठवला हे चांगले झाले. आज एवढे पुरे. आपण वाचत राहा सुख दुःखाचे तरंग माणसा-माणसाचे वाचत राहा. स्वस्थ रहा मस्त राहा. सुप्रभात. आपला दिवस आनंदी जावो हिच गुरू चरणी प्रार्थना.



चंचल हे मन

इकडून तिकडे सदा
घेते ते भरारी
चंचल हे मन
ना येई हाती
खूप गतीने फिरे
आनंदी,छान जीवन

चंचल हे मन
फुलपाखरु छान जसे
नित भिरभिर उडते
कधी आकाशी तर
कधी पाताळी जाई
दाही दिशा फिरते

पी.यू.जैन माध्यमिक विद्यालयाचा रौप्य महोत्सव सोहळा संपन्न

आंतरशालेय प्रश्नमंजुषा स्पर्धा व पारितोषिक वितरण उत्साहात



ज्योतिर्मय साहित्य

छत्रपती संभाजीनगर – पी. यू. जैन यांच्या जयंतीनिमित्त जैन शिक्षण संस्था संचलित पी. यू. जैन माध्यमिक विद्यालय, राजाबाजार आणि लायन्स क्लब ऑफ छत्रपती संभाजीनगर सेंट्रल यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित रौप्य महोत्सवी (२५ वे वर्ष) निमित्त आंतरशालेय प्रश्नमंजुषा स्पर्धा व पारितोषिक वितरण सोहळा उत्साहात संपन्न झाला. विद्यार्थ्यांमध्ये ज्ञानाची आवड निर्माण करणे, बौद्धिक क्षमता वाढविणे, स्पर्धात्मक वृत्ती विकसित करणे आणि शैक्षणिक गुणवत्ता वृद्धिंगत करणे हा या स्पर्धेचा मुख्य उद्देश होता. सलग तीन दिवस रंगलेल्या या स्पर्धेत शहर व ग्रामीण भागातील विविध शाळांच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

स्पर्धेचे उद्घाटन आणि बौद्धिक चुरस

स्पर्धेचे उद्घाटन श्री. अतुल सेठी यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी लायन्स क्लबचे अध्यक्ष लायन आशिष अग्रवाल, राजेश बलदवा, राहुल गोसावी, अल्केश रावका, मनीष धूत, नितीन बोहरा आणि सुचेता सेठी यांची प्रमुख उपस्थिती होती.

विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. विजय एस. पाटोदी यांनी प्रास्ताविकातून स्पर्धेची पार्श्वभूमी, स्वरूप आणि उद्दिष्टे स्पष्ट केली. गेल्या २५ वर्षांपासून सातत्याने आयोजित करण्यात येणाऱ्या या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या ज्ञानाला, आत्मविश्वासाला आणि बौद्धिक विकासाला चालना मिळत असल्याचे त्यांनी नमूद केले. त्यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले.

स्पर्धेदरम्यान विद्यार्थ्यांनी विविध विषयांवरील प्रश्नांना आत्मविश्वासाने उत्तरे देत आपले ज्ञान, आकलनशक्ती, समयसूचकता आणि संघभावना यांचे उत्कृष्ट प्रदर्शन केले. शहर व ग्रामीण विभागातील संघांमध्ये चुरशीची स्पर्धा पाहायला मिळाली.

राजेंद्र दर्डा यांच्या हस्ते पारितोषिक वितरण

स्पर्धेच्या समारोपप्रसंगी महाराष्ट्राचे माजी शालेय शिक्षणमंत्री मा. श्री. राजेंद्र दर्डा यांच्या हस्ते विजेत्या संघांना रोख पारितोषिके, चषक, गौरवचिन्हे आणि प्रमाणपत्रे देऊन सन्मानित करण्यात आले. समारोप व पारितोषिक वितरण सोहळ्याचे अध्यक्षस्थान श्री. महावीर सेठी यांनी भूषविले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी विद्यालयातील विद्यार्थिनी आणि संगीत विभागाच्या चमूने स्वागतगीत, मंगलाचरण व सांस्कृतिक सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली. श्री. राजेंद्र दर्डा यांना संस्थेच्या वतीने संगीतमय मानवंदनाही अर्पण करण्यात आली.

जैन शिक्षण संस्था कार्यालयाचे लोकार्पण

शैक्षणिक दैनंदिनीचे विमोचन

याच कार्यक्रमादरम्यान जैन शिक्षण संस्थेच्या कार्यालयाचे लोकार्पण तसेच विद्यालयाच्या शैक्षणिक दैनंदिनीचे विमोचन श्री. राजेंद्र दर्डा यांच्या शुभहस्ते करण्यात आले.

शिक्षण, समाजकारण आणि राजकारण या क्षेत्रांतील त्यांच्या योगदानाबद्दल संस्थेच्या वतीने त्यांचा नागरी सत्कार करण्यात आला.

संस्था कार्यालयाच्या उभारणीसाठी मोलाचे योगदान देणाऱ्या सेठी परिवाराचाही यावेळी विशेष गौरव करण्यात आला. स्वर्गीय माणिकचंद सेठी यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ निर्माण करण्यात आलेल्या कक्षाच्या निमित्ताने श्री. महावीर सेठी, श्री. प्रकाश सेठी, श्री. राजेंद्र सेठी, सौ. कल्पना सेठी आणि सौ. संगीता सेठी यांना मान्यवरांच्या हस्ते गौरवपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे आणि उपक्रमशीलतेचे कौतुक

श्री. राजेंद्र दर्डा यांनी संस्थेच्या शैक्षणिक कार्याचे कौतुक केले. त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत त्यांच्या उपक्रमशीलतेचे आणि विविध कलागुणांचे महत्त्व अधोरेखित केले. विद्यालयातील संगीत शिक्षिका आणि विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमांचे त्यांनी विशेष कौतुक केले.

जलसंवर्धनाचा संदेश देणारे भारूड हे कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरले. सामाजिक प्रबोधन आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश कलात्मक पद्धतीने पोहोचविणाऱ्या या सादरीकरणाचे त्यांनी विशेष कौतुक केले.

यावेळी कार्तिकी गायकवाड आणि पूनम गवळी यांनी सुंदर व प्रभावी भाषणे केली. त्यांनी प्रश्नमंजुषा स्पर्धेच्या आयोजनाबाबत आपल्या प्रतिक्रिया व्यक्त करत या उपक्रमाचे कौतुक केले. विद्यार्थ्यांच्या ज्ञानवृद्धीसाठी, बौद्धिक विकासासाठी आणि आत्मविश्वास वाढविण्यासाठी अशा स्पर्धांचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले.

ग्रामीण व शहर विभागातील पारितोषिक विजेते संघ

ग्रामीण आणि शहर विभागासाठी स्वतंत्र पारितोषिके ठेवण्यात आली होती. दोन्ही विभागांतील विजेत्या संघांचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

ग्रामीण विभाग

प्रथम क्रमांक : गुरुदेव समंतभद्र विद्यामंदिर, वेरूळ (ता. खुलताबाद)– गगन नवले, संस्कृती साबळे

द्वितीय क्रमांक : जि. प. प्रशाला, रांजणगाव (ता. गंगापूर)– गायत्री खुळखुळे, शिवानी बोरसे

तृतीय क्रमांक : पीएमश्री जि. प. प्रशाला, गणोरी (ता. फुलंब्री)– शिवराज तांदळे, सोहम पेहेरकर

उत्तेजनार्थ प्रथम : भगवान महावीर स्कूल, बजाजनगर (ता. गंगापूर) स्नेहल कणके, सृष्टी तागड

उत्तेजनार्थ द्वितीय : जि. प. प्रशाला, शेंदूरवादा (ता. गंगापूर) – बुशरा पठाण, प्रतीक म्हैसमाळे

शहर विभाग

प्रथम क्रमांक पी.यू.जैन माध्यमिक विद्यालय – श्रावणी नलावडे, आराध्या सरोदे

द्वितीय क्रमांक : अनंत भालेराव विद्यामंदिर– तुषार सोनवणे, उदित गाडगीळ

तृतीय क्रमांक –जय भवानी विद्यामंदिर – जयराज उबाळे, अभिषेक चौधरी

उत्तेजनार्थ प्रथम – देसरडा पब्लिक स्कूल, अद्वैता खळीकर, श्रद्धा जाधव

उत्तेजनार्थ द्वितीय – आर्य चाणक्य विद्यामंदिर धनंजय गोंडगे, आदित्य जाधव

दोन्ही विभागांतील प्रथम क्रमांकाच्या संघांना प्रत्येकी ४,१०१ रुपये, चषक, गौरवचिन्हे व प्रमाणपत्रे देण्यात आली. द्वितीय क्रमांकासाठी प्रत्येकी ३,१०१ रुपये, तृतीय क्रमांकासाठी प्रत्येकी २,१०१ रुपये, तर दोन्ही उत्तेजनार्थ क्रमांकांसाठी प्रत्येकी १,१०१ रुपये देण्यात आले. विजेत्या विद्यार्थ्यांसह मार्गदर्शक शिक्षकांचाही गौरवचिन्हे व प्रमाणपत्रे देऊन सन्मान करण्यात आला.

मान्यवरांची उपस्थिती

कार्यक्रमाला संस्थापक सदस्य वर्धमान पांडे, ललित पाटणी, देवेंद्र काला, महावीर ठोळे, दिलीप बाकलीवाल, प्रकाश कासलीवाल, संजय कासलीवाल, पुष्पा बडजाते, वैभव काला, संतोष पापडीवाल, शैलेश चंदिवाल भरत पापडीवाल, शरद दांडगे, गुलाबचंद बोराळकर आणि अमित काला, समय चुडीवाल, राजेश चुडीवाल यांची प्रमुख उपस्थिती होती.संस्थेच्या सचिव सौ. आशादेवी काला, उपाध्यक्ष सुनील सेठी, कोषाध्यक्ष डॉ. रमेश बडजाते, सहसचिव सुनील अजमेरा, सावन चुडीवाल, शैलेश पाटणी, राजेश कासलीवाल, रश्मी पाटणी, कविता ठोळे, संजय व्यापारी, सुवर्णा शहा, उषा कासलीवाल, भारती देशमुख, शर्मिला जैन, अजय पहाडे, सुलभा आहेरकर, दर्शना पाटणी, प्रियंका कासलीवाल, रचना कासलीवाल, मनिषा पाटील, विजय चौधरी आणि,मंजुषा तुंगावकर यांच्यासह शिक्षक, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन विशाल पाटणी यांनी केले. पहिल्या सत्राचे आभार महावीर संगवे यांनी मानले, तर समारोपाच्या अंतिम सत्राचे आभार सावन चुडीवाल यांनी मानले. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी विशाल शाह, नीरज कासलीवाल, त्रिशला वायकोस, गणेश चौधरी, पवन तुपे, किशोर राजपूत आणि प्रफुल्ल झांजरी यांनी तांत्रिक सहकार्य केले.

नगरसेविका अनिता काटे यांच्या संकल्पनेतून पिंपळे सौदागर येथे दांडिया महोत्सव

ज्योतिर्मय साहित्य

पुणे – नवरात्र उत्सवानिमित्त पिंपळे सौदागर येथे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नगरसेविका अनिता काटे आणि चॅलेंजर पब्लिक स्कूलचे संचालक संदीप काटे यांच्या संकल्पनेतून भव्य दांडिया महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. चॅलेंजर पब्लिक स्कूलच्या प्रांगणात दि. १६ ते १८ ऑक्टोबर या दरम्यान तीन दिवस रोज सायंकाळी सात ते दहा या वेळेत होणाऱ्या या महोत्सवात परिसरातील देवीभक्त या उपक्रमात सहभागी होणार आहेत. महोत्सवा दरम्यान सोसायटी ग्रुप डान्स, कपल डान्स, लहान मुलांप्रमाणेच



मोठ्यांसाठी उत्कृष्ट वेशभुषेबद्दल बक्षिसे

दिली जाणार आहेत. या व्यतिरिक्त विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या नऊ महिलांचा सन्मान करण्यात येणार आहे. निलेश काटे युवा मंचच्या माध्यमातून गेल्या दहा वर्षांपासून सदरील दांडिया महोत्सवाचे आयोजन केले जात असून यंदा आजपासून या महोत्सवास प्रारंभ होत आहे. या उत्सवात नारीशक्तीचा सन्मान व्हावा, त्यांच्या कार्य कर्तृत्वाला प्रोत्साहन मिळावे, इतरांसाठी त्यांच्या कार्यापासून प्रेरणा मिळावी या उद्देशाने दरवर्षीप्रमाणे यंदाही विविध क्षेत्रातील कर्तृत्ववान महिलांच्या सन्मानाचा उपक्रम राबवित असल्याची माहिती अनिता काटे आणि संदीप काटे यांनी दिली.












हिरवा रंग : जीवनाचे, चैतन्याचे, सौभाग्याचे तसेच उत्साहाचे प्रतीक

ज्योतिर्मय साहित्य

हिंदू संस्कृती परंपरेतील शारदीय नवरात्र उत्सवात हिरवा रंग प्रामुख्याने माता कात्यायनी (षष्ठी/सहाव्या दिवशी) आणि काही पंचांग/परंपरेनुसार माता ब्रह्मचारिणी (दुसऱ्या दिवशी) किंवा स्कंदमाता यांच्याशी संबंधित मानला जातो. नवरात्रीमध्ये हिरवा रंग निसर्ग, समृद्धी, चैतन्य, नवीन सुरुवात आणि मुख्य म्हणजे स्त्रीशक्तीचे (मातृशक्तीचे) प्रतीक मानला जातो. हिरवी साडी हिरवा चुडा हिरव्या बांगड्या हे सर्व स्त्रियांच्या सौभाग्याचे प्रतीक लेणं आदरानं मानलं जातं.

हिरवा रंग हा निसर्गाचा रंग आहे, जो शेती, हिरवळ आणि जीवनभराच्या वाढीचे व प्रजननक्षमतेचे प्रतीक ही मानला जातो. हिरवे झाड झुडप शेती पाहिल्यानंतर जो नैसर्गिक आनंद मनाला होतो तो कितीही पैसे खर्च करून होणाऱ्या आनंदाहून काही पटीने अधिक असतो.



आपल्या भारताच्या राष्ट्रध्वजामध्ये तिरंग्यामधील हिरवा रंग, निसर्गाचा रंग – प्रगती, भरभराट, समृद्धी,सुसंवाद, स्थिरता,संतुलन, सहनशक्ती , अंत:र्बाह्य सौंदय आणि चैतन्याचे प्रतीक आहे.

मानसशास्त्रानुसार हिरवा रंग हा रंग मनाला शांतता, सकारात्मक ऊर्जा आणि मानसिक समतोल देणारा मानला जातो. म्हणूनच घरातील एखाद्या भिंतीला हिरवा रंग अवश्य असावा. आणि गॅलरीमध्ये, अंगणामध्ये, घराच्या आजूबाजूला शक्य तितकी हिरवी झाडं लावलेली असावी ज्याने मन शांत समाधानी आणि उत्साही राहते. सर्व हिरवी झाड मिळूनच आपल्याला प्राणवायू देतात म्हणूनच हिरव्या रंगापासून जीवनाची उत्पत्ती होते असे म्हणणे चुकीचे असणार नाही. शारदीय नवरात्र उत्सवात हा रंग परिधान केल्याने किंवा पूजेत वापरल्याने देवीची कृपा, उत्साह आणि चांगल्या भविष्याची आशा लाभते असे मानले जाते.

चित्रकलेमध्ये हिरव्या रंगाची निर्मिती, पेंटिंग किंवा छपाईमध्ये हा पिवळा आणि निळा रंग एकत्र करून तयार होतो, तर कॉम्प्युटर किंवा टीव्हीच्या मॉडेल्समध्ये तो हिरव्या प्रकाशाच्या माध्यमातून दिसतो.

निसर्ग आणि आरोग्य: हिरवा रंग झाडे, पाने आणि निसर्गाचे प्रतीक आहे. हा आरोग्य, वाढ आणि चैतन्य दर्शवतो. जगाच्या पाठीवर नांदणाऱ्या अनेक संस्कृतींमध्ये हा रंग समृद्धी, संपत्ती आणि चांगल्या भाग्याचा संकेत असा ही मानला जातो. हा रंग मनाला शांतता देणारा आणि तणाव दूर करणारा असतो असे ही अनुभवाने म्हणले जाते. ट्रॅफिक सिग्नल किंवा इतर यंत्रणांमध्ये हिरवा रंग पुढे जाण्याची परवानगी किंवा यश दर्शवतो. हिरवा रंग आवडणारी माणसं निसर्गप्रेमी, बुद्धिप्रामण्यवादी,निरपेक्ष प्रेम करणारी असतात दुसऱ्याला आणि स्वतःला क्षमा करण्याची ताकद त्यांच्याकडे असते. दुसऱ्याचे मन संभाळण्याचा ते आटोकाट प्रयत्न करतात.



सकाळी फिरायला जाण्याचे महत्त्व देखील हिरवा रंग असलेल्या निसर्गाच्या सानिध्याशी अधिक आहे. सकाळी हिरवेगार वृक्ष, वेली पाहण्याने डोळ्यातील सूक्ष्म वाहिन्यांना शीतलता प्राप्त होते. विश्रांती मिळते, मन ताजेतवाने होते कारण हा रंग रिफ्रेशिंग आहे. हिरव्या पालेभाज्या दररोजच्या आहारात नियमित खाण्यात असाव्यात हे तर उत्कृष्ट आरोग्यासाठी आवर्जून सांगितलं जातं.

थोडक्यात सांगायचं झालं तर शारदीय नवरात्र उत्सवातील सहाव्या दिवशी विशिष्ट मान मिळालेला हिरवा रंग हा जीवनाचे , चैतन्याचे, सौभाग्याचे तसेच उत्साहाचे प्रतीक आहे.

३२ महिन्यांचे वेतन थकीत; १५ दिवसांत प्रलंबित वेतन देण्याचे निर्देश

भारतीय मजदूर संघाच्या पाठपुराव्याला यश; प्रश्न न सुटल्यास संस्थेवर कायदेशीर कारवाई करण्याबाबत मंत्र्यांचा इशारा

ज्योतिर्मय साहित्य

पुणे – सिंहगड टेक्निकल एज्युकेशन सोसायटीमधील कामगारांचे गेल्या ३२ महिन्यांपासून प्रलंबित असलेले वेतन, भविष्य निर्वाह निधी () आणि अन्य विविध प्रश्न मार्गी लावण्यासाठी भारतीय मजदूर संघाच्या पुढाकाराने महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. गेल्या तीन महिन्यांपासून या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी कामगारांचे आंदोलन व सत्याग्रह सुरू असून, या पार्श्वभूमीवर महाराष्ट्राचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री श्री. चंद्रकांत पाटील यांच्यासोबत भारतीय मजदूर संघाच्या पदाधिकाऱ्यांची बैठक झाली.

या बैठकीत कामगारांच्या प्रलंबित वेतनासह पीएफ व अन्य प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. वेतनप्रश्नी येत्या १५ दिवसांत आवश्यक कार्यवाही करून अंमलबजावणी करण्याचे स्पष्ट निर्देश मंत्री श्री. चंद्रकांत पाटील यांनी दिल्याची माहिती भारतीय मजदूर संघाच्या पदाधिकाऱ्यांनी दिली. तसेच, प्रश्नांची वेळेत सोडवणूक न झाल्यास संस्थेवर कायदेशीर कारवाई करण्याबाबत शासनाला विचार करावा लागेल, असा इशाराही मंत्र्यांनी दिल्याचे सांगण्यात आले.

गेल्या अनेक महिन्यांपासून वेतन प्रलंबित असल्यामुळे कामगार आणि त्यांच्या कुटुंबीयांना गंभीर आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे.



भविष्य निर्वाह निधी () आणि अन्य प्रलंबित देण्यांचे प्रश्नही अद्याप सुटलेले नाहीत. कामगारांच्या या न्याय्य मागण्यांची तातडीने पूर्तता व्हावी, यासाठी कामगारांनी आंदोलन व सत्याग्रहाच्या माध्यमातून आपला लढा सुरू ठेवला आहे.

भारतीय मजदूर संघाने कामगारांच्या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी सातत्याने पाठपुरावा केला आहे. मंत्र्यांसोबत झालेल्या या बैठकीमुळे प्रलंबित प्रश्नांच्या सोडवणुकीच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण पाऊल पडले आहे. मात्र, बैठकीत देण्यात आलेल्या निर्देशांची निर्धारित मुदतीत प्रत्यक्ष अंमलबजावणी होऊन कामगारांना त्यांचे प्रलंबित वेतन व अन्य न्याय्य हक्क मिळणे आवश्यक आहे.

यावेळी भारतीय मजदूर संघाचे महाराष्ट्र प्रदेश संघटन सचिव श्री. बाळासाहेब भुजबळ म्हणाले, ''सिंहगड टेक्निकल एज्युकेशन सोसायटीतील कामगारांना न्याय मिळवून देण्यासाठी भारतीय मजदूर संघ सातत्याने प्रयत्नशील आहे. ३२ महिन्यांपासून प्रलंबित असलेले वेतन, पीएफ आणि अन्य प्रश्न तातडीने निकाली निघणे आवश्यक आहे. बैठकीत देण्यात आलेल्या निर्देशांची निर्धारित मुदतीत अंमलबजावणी झाली पाहिजे. कामगारांना त्यांचे न्याय्य हक्क मिळेपर्यंत भारतीय मजदूर संघाचा संघर्ष सुरूच राहील.''

बैठकीस मान्यवरांची उपस्थिती सिंहगड टेक्निकल एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष श्री एम एन नवले संचालक श्री प्रकाश पाटील तंत्र शिक्षण विभागाचे संचालक श्री प्रमोद नाईक सहसंचालक डॉक्टर सुरेश पाटील तंत्र शिक्षण विभागाचे आवर संचिव श्री अमोल मुत्याल उच्च शिक्षण विभागाचे संचालक श्री शैलेंद्र देवळणकर, उच्च विभागाचे सहसंचालक डॉक्टर उबाळे व तंत्र शिक्षण व उच्च विभाग उच्च शिक्षण विभागाचे वरिष्ठ अधिकारी या मीटिंगसाठी मंत्रालयात उपस्थित होते भारतीय मजदूर संघाच्या वतीने प्रदेश संघटन मंत्री बाळासाहेब भुजबळ श्री अनिकेत जाधव कामगार प्रतिनिधी कोंढवा कॅम्पस श्री औदुंबर ताठे कामगार प्रतिनिधी नरे कॅम्पस व श्री शुभम फाळके कामगार प्रतिनिधी लोणावळा कॅम्पस इत्यादी संघटनेचे पदाधिकारी या मीटिंगसाठी मंत्रालयात उपस्थित होते मीटिंग चांगल्या पद्धतीने संपन्न झाली व या कर्मचाऱ्यांच्या भवितव्याच्या दृष्टीने व संस्थेच्या भवितव्याच्या दृष्टीने एक सकारात्मक पाऊल पुढे पडल्याची माहिती संघटनेचे प्रदेश संघटन मंत्री बाळासाहेब भुजबळ यांनी यावेळी बोलताना दिली सर्व वस्तूंचे मंत्रिमंडळाचे व सिंहगड संस्थेचे अध्यक्ष श्री एम एन नवले सर यांचे बाळासाहेब भुजबळ यांनी आभार मानून सदरची मीटिंग संपन्न झाली. कामगारांच्या प्रलंबित प्रश्नांची वेळेत सोडवणूक होऊन त्यांना न्याय मिळेल, अशी अपेक्षा कामगारांकडून व्यक्त केली जात आहे. वेतन, पीएफ आणि अन्य प्रलंबित प्रश्न प्रत्यक्ष निकाली निघेपर्यंत भारतीय मजदूर संघाचा संघर्ष सुरूच राहणार असल्याचा निर्धार भारतीय मजदूर संघ महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष सचिन मेंगाळे यांनी व्यक्त केला आहे.

पारंपरिक रंगकलांसह विद्यार्थी गिरवताहेत छाऊ नृत्याचे धडे!

ज्योतिर्मय साहित्य



छत्रपती संभाजीनगर – डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या डिपार्टमेंट ऑफ परफॉर्मिंग आर्टस् (नाट्यशास्त्र) विभागात छाऊ नृत्य कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. भारतीय पारंपरिक रंगकला व छाऊ नृत्याचा विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभव मिळावा, या उद्देशाने दहा दिवस (९ ते १८ ऑक्टोबर २६) ही विशेष कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. या कार्यशाळेत प्रसिद्ध रंगमंच दिग्दर्शक व छाऊ गुरू भुमिकेश्वर सिंह नाट्यशास्त्राच्या विद्यार्थ्यांना छाऊ नृत्याचे धडे देत आहेत.

गुरू भुमिकेश्वर यांना रंगमंच/निर्देशनासाठी उत्तर प्रदेश संगीत नाटक अकादमीचा पुरस्कार प्राप्त झालेला असून, भारतीय पारंपरिक रंगकला आणि छाऊ नृत्य प्रशिक्षणाचा त्यांना प्रदीर्घ अनुभव आहे. त्यांनी देशभरात विविध नामांकित संस्थांमध्ये छाऊ नृत्यासह रंगमंच व मुकाभिनय (माईम) विषयांवर कार्यशाळा घेवून हजारो विद्यार्थी प्रशिक्षित केले आहेत.

सिंह माईमचेही तज्ज्ञ

भूमिकेश्वर सिंह यांनी श्रीराम सेंटर फॉर परफॉर्मिंग आर्टस, नवी दिल्ली येथून अभिनयाचे प्रशिक्षण घेतले असून, छाऊ नृत्याचे प्रशिक्षण तसेच भारतीय युद्धकला परंपरेतील फरी-खांडा यांचा विशेष अभ्यास केला आहे. तसेच सरायकेला शैलीतील मुखवटा निर्मिती आणि मुकाभिनय (माईम) चे प्रशिक्षणही त्यांनी घेतलेले आहे.

उत्तरोत्तर कार्यशाळेत रंगत

विद्यापीठाच्या नाट्यशास्त्र विभागात आयोजित कार्यशाळा दिवसेंदिवस चांगलीच रंगतदार होत असून, विद्यार्थ्यांमध्ये छाऊ नृत्याबद्दल विशेष कुतुहल निर्माण होत आहे. दररोज सकाळी ७ ते ९ या वेळेत ही कार्यशाळा सुरू आहे. छाऊ नृत्याची शारीरिक/आंगिक भाषा, हालचाल, अभिनय, मुखवटा, लय-ताल आणि पारंपरिक रंगमंचीय अभिव्यक्ती यांचा विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष प्रशिक्षणातून परिचय करून दिला जात आहे.

नामांकित संस्थांत कार्यशाळा

भूमिकेश्वर सिंह यांनी देशातील अनेक विद्यापीठांसह नाट्यसंस्थांमध्ये कार्यशाळा घेतल्या असून, पंजाब विद्यापीठ, चंदीगड, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, भारतेंदू नाट्य अकादमी, लखनौ, कोलकातामधील नॅशनल माईम इन्स्टिट्यूट, मध्य प्रदेशातील भोपाळमधील नाट्य विद्यालय आणि नवी दिल्लीमधील राष्ट्रीय नाट्य विद्यालय

(एनएसडी) आदींचा यात समावेश आहे. ही कार्यशाळा विद्यार्थ्यांसाठी भारतीय पारंपरिक रंगकलेचा सखोल अनुभव घेण्याची आणि छाऊ नृत्याच्या समृद्ध परंपरेशी प्रत्यक्ष संवाद साधण्याची महत्त्वपूर्ण संधी ठरणार आहे, असे विभाग प्रमुख प्रा. डॉ. वैशाली बोदेले यांनी सांगितले.

कुटुंबप्रमुख हवा आहे ! भाग ९ : मनाचे श्लोक

ज्योतिर्मय साहित्य

'आजोबा, काल तुम्ही योगशास्त्राचे गुपित सांगणार होतात. शरीर आणि मन यांच्यात समन्वय साधण्याची अवस्था कशी मिळवायची, हे आज तरी सांगणार ना?' दुसऱ्या दिवशी श्रीरामने भेटताच विचारले.

'अरे वा! श्रीराम, तुझी जिज्ञासा पाहून आनंद वाटतो. आपण काल पातंजल योगसूत्रातील ''योगश्चित्तवृत्तिनिरोधः'' हे सूत्र पाहिले. त्यातील तीन शब्द समजून घेऊ या, चित्त, वृत्ती आणि निरोध.'

'आजोबा, तुम्ही चित्त म्हणजे मन नव्हे, असे म्हणाला होतात. मग चित्त म्हणजे नेमके काय?' श्रीरामने विचारले.



'मन, बुद्धी, अहंकार आणि चित्त यांचा भारतीय तत्त्वज्ञानात वेगवेगळ्या संदर्भात विचार केला जातो. येथे चित्त म्हणजे आपल्या मानसिक अनुभवांचे क्षेत्र, असे तू प्राथमिक स्वरूपात समजून घे. विचार, भावना, स्मृती आणि मनात उमटणारे विविध तरंग यांच्याशी चित्तवृत्तींचा संबंध आहे.'

'म्हणजे मनात सतत विचार येत असतात, त्यांनाच चित्तवृत्ती म्हणायचे का?' श्रुतकीर्तीने विचारले.

'विचार हे चित्तवृत्तींचे एक रूप आहे. पण चित्तवृत्ती केवळ विचारांपुरत्या मर्यादित नाहीत. आपल्या जाणिवा आणि मानसिक अनुभव यांचाही त्यात समावेश होतो.'

'आणि निरोध म्हणजे हे सगळे थांबवायचे?' श्रीरामने विचारले.

'निरोध म्हणजे केवळ विचार दाबून टाकणे नव्हे, बाळा! चित्ताच्या वृत्तींचे नियमन करून त्यांच्यावर संयम मिळवणे, हा त्यामागचा अर्थ आहे. त्यासाठी नियमित अभ्यास, सजगता आणि मनाला योग्य दिशा देणारे संस्कार महत्त्वाचे ठरतात.'

'पण आजोबा, योगामुळे शरीर आणि मन यांचा संबंध कसा सुधारतो? फेविकोलचे उदाहरण तुम्ही दिले होते ना!' श्रुतकीर्तीने आठवण करून दिली.

'हो. फेविकोल दोन वस्तूंना जोडते; पण योग हे काही रसायन नाही. योगाभ्यासात शरीराची स्थिती, श्वास आणि मनाची एकाग्रता यांचा समन्वय साधण्याचा प्रयत्न केला जातो. त्यामुळे शरीर आणि मन यांच्यातील परस्परसंबंध अधिक चांगल्या प्रकारे समजण्यास मदत होते.'

'म्हणजे योग म्हणजे फक्त आसने करणे नव्हे, तर स्वतःच्या मनालाही समजून घेणे!' श्रीराम म्हणाला.

'अगदी बरोबर! परंतु मुलांनो पातंजल योगसूत्र समजण्याला खूप कठीण आहे. आपण त्यापेक्षा समजण्याला सोप्पे आणि मनाला योग्य दिशा देण्याच्या संदर्भातच समर्थ रामदासस्वामींच्या मनाच्या श्लोकांचा अभ्यास करणार आहोत.'

'मग आजपासूनच सुरुवात करू या ना, आजोबा!' दोन्ही मुले उत्साहाने म्हणाली.

आजोबा हसले. 'अवश्य! पुढच्या वेळी आपण मनाच्या श्लोकांकडे वळू.'

'आज का नाही, आजोबा?' श्रीरामने विचारले.

'श्रीराम, तू मला सांग, तू एका वेळी किती दिवसांचे जेवण करतोस?' आजोबांनी विचारले.

'फक्त एका वेळचे!' श्रीराम म्हणाला.

'का बरे? दोन वेळचे किंवा महिनाभराचे जेवण एकदम का करत नाहीस?'

'असे कसे, आजोबा! आपण जे खातो, ते पचायलाही तर हवे ना!' श्रीराम म्हणाला.

'अगदी बरोबर! तसेच आपल्या बुद्धीचेही आहे, श्रीराम. आपण जे शिकतो, ते समजून घेऊन आत्मसात करायला वेळ लागतो. म्हणून एका वेळी जेवढे समजून घेता येईल, तेवढेच शिकावे.'

'कळले, आजोबा! ठीक आहे, मग उद्या सांगा मनाच्या श्लोकांविषयी!' श्रीराम म्हणाला.

(क्रमशः भाग १० : मनाचे श्लोक)

प्रसिद्ध लेखक चेतन भगत यांच्या हस्ते डॉ. सोनल कुलकर्णी यांच्या 'Five Rooms of Health' पुस्तकाचे प्रकाशन

आधुनिक वैद्यकीय ज्ञान, योग, ध्यान आणि भारतीय तत्त्वज्ञान यांचा संगम साधणारे पुस्तक



'India Prime Woman Icon Award', 'Arogyadeep Woman Doctor Award' आणि 'Yoga Ratna Samman' यांसारख्या पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे.

आरोग्याच्या पाच पैलूंचा वेध

'Five Rooms of Health' या पुस्तकात शरीर, श्वास, मन, विवेक आणि अंतर्मनातील शांतता या आरोग्याच्या पाच महत्त्वपूर्ण पैलूंचा ऊहापोह करण्यात आला आहे. दैनंदिन जीवनातील छोट्या सवयींचा दीर्घकालीन आरोग्यावर कसा परिणाम होऊ शकतो, हे सोप्या आणि व्यावहारिक पद्धतीने समजावून सांगण्यात आले आहे.

पुस्तकात योग्य आहार, नियमित व्यायाम, योग, श्वसनाचे महत्त्व, झोप, तणाव व्यवस्थापन आणि भावनिक आरोग्य यांसारख्या विषयांचा समावेश आहे. तसेच इरिटेबल बॉवेल सिंड्रोम (IBS), मधुमेह आणि संधिवात यांसारख्या आरोग्यविषयक समस्यांबाबत जागरूकता निर्माण करण्यावर भर देण्यात आला आहे.

या पुस्तकाचे वैशिष्ट्य म्हणजे आधुनिक वैद्यकीय ज्ञानासोबत योगसूत्रे, उपनिषदे आणि भगवद्गीतेतील विचारांची सांगड घालण्यात आली आहे. वैद्यकीय अनुभवांवर आधारित कथांच्या माध्यमातून विषय समजावून सांगताना, प्रत्येक प्रकरणाच्या शेवटी वाचकांना दैनंदिन जीवनात अमलात आणता येतील अशा व्यावहारिक सूचनाही देण्यात आल्या आहेत. आजच्या धावपळीच्या जीवनात आरोग्य ही केवळ आजार नसण्याची स्थिती नसून शरीर, मन आणि जीवनशैली यांच्यातील संतुलन आहे, हा महत्त्वपूर्ण संदेश या पुस्तकातून देण्यात आला आहे. डॉ. सोनल कुलकर्णी यांच्या या पुस्तकामुळे प्रतिबंधात्मक आरोग्य, सजग जीवनशैली आणि सर्वांगीण आरोग्याविषयी जागरूकता वाढण्यास मदत होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

ज्योतिर्मय साहित्य I मुंबई, १४ ऑक्टोबर २०२६ : प्रसिद्ध लेखक चेतन भगत यांच्या हस्ते डॉ. सोनल कुलकर्णी यांच्या 'Five Rooms of Health' या पहिल्या पुस्तकाचे प्रकाशन बुधवारी, १४ ऑक्टोबर २०२६ रोजी मुंबईतील ताज हॉटेल, सांताक्रूझ येथे पार पडले. आरोग्य, निरोगी जीवनशैली आणि प्रतिबंधात्मक आरोग्यसेवेचा सर्वांगीण दृष्टिकोन मांडणाऱ्या या पुस्तकामुळे डॉ. कुलकर्णी यांच्या लेखनप्रवासाला महत्त्वपूर्ण सुरुवात झाली आहे. डॉ. सोनल कुलकर्णी या Jeevan Amrit Health Care च्या संस्थापक असून होमिओपॅथी, क्लिनिकल न्यूट्रिशन, योग आणि ध्यान या क्षेत्रांत कार्यरत आहेत. त्या Yoga Alliance शी संबंधित आंतरराष्ट्रीय ध्यान प्रशिक्षक असून त्यांना योग मानसशास्त्राचे प्रशिक्षण आणि क्लिनिकल न्यूट्रिशनमध्ये फेलोशिप प्राप्त आहे. त्यांच्या कार्याची दखल घेत त्यांना 'औरंगाबाद भूषण',



हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559

फसगत...

ज्योतिर्मय साहित्य

राधेश्याम हा शहराजवळील एका खेड्यात राहत होता. पत्नी, एक मुलगा व दोन मुली असे त्याचे कुटुंब होते. राधेश्याम शहरातील एका लहान कंपनीमध्ये मजुरीचे काम करत होता. तो एका पायाने लंगडा होता. त्याला काठीचा आधार घेऊन चालावे लागे. तरीही तो त्याला जमणारे काम कंपनीत करत होता. परिस्थिती गरीबीची असली तरी मजुरी करून हे कुटुंब आपल्या गरजा भागवत होते. मुलगा हा मोठा होता. त्याने पदवीचे शिक्षण घेतले होते. परंतु तो सुद्धा खाजगी कंपनीत मजुरीचे काम करायचा. मुलगी श्वेता ही दहावीला शिकत होती. दुसरी मुलगी प्रिया नववीमध्ये शिकत होती. त्या घरी आईला घरकामात मदत करायच्या. व सुटीचे दिवसी शेतात आई सोबत कामाला जायच्या.

त्याच कंपनीत छत्तीसगडवरून आलेला ललनसिंग हा देखील मजुरीचे काम करायचा. राधेश्याम व ललनसिंगमध्ये कधी कधी वार्तालाप होत असे. हळूहळू राधेश्याम व ललनसिंग यांच्यात मैत्री झाली. ललनसिंगचे कुटुंब त्याने सोबत आणलेले नव्हते. मग सुटीच्या दिवसी तो कुठेतरी फिरायला जायचा. एक दिवस राधेश्यामने त्याला आपल्या घरी आणले. कुटुंबातील सदस्यांना त्याचा परीचय करून दिला. राधेश्यामचे मुलं त्याला काका म्हणू लागले. पुढे ललनसिंग जणू त्यांच्या कुटुंबाचा सदस्यच असल्यासारखा झाला. त्याने सर्वांचा विश्वास जिंकला होता. एका सुटीच्या दिवशी त्याने त्याच्या खोलीवर सत्यनारायणाची कथा आयोजित केली. त्याने राधेश्यामला फोन करून मुली व तुम्ही कार्यक्रमाला या असे सांगितले त्यानुसार राधेश्याम व मुली गेल्या. संध्याकाळी ते घरी परतले. आता ललनसिंगचा नित्यनेम झाला काम पडताच तो मुलींना बोलवून घ्यायचा व संध्याकाळी मुली घरी सुखरूप यायच्या. शंकेला कुठेही जागा नव्हती.

या संधीचा फायदा घेऊन त्याने राधेश्यामला मुलींना पाठवण्याची विनंती केली. घरी पाहुणे आल्याचे कारण सांगितले. काहीही विचार न करता राधेश्यामने मुलींना ललनसिंगकडे पाठवले. संध्याकाळी मुली घरी येतील या आस्थेने राधेश्याम शांत होता. रात्रीचे आठ वाजले मुली अजून घरी परतल्या नव्हत्या. ललनसिंगला फोन लावला तर त्याने मुलींना टॅटोने बसवून दिल्याचे सांगितले. रात्रीचे नऊ, दहा, अकरा वाजले मुलींचा पत्ता नाही. ललनसिंगाचा फोन बंद येत होता. राधेश्यामचा मुलगा चक्रधर पोलीसस्टेशनला जाऊन तक्रार देऊन आला. तक्रारीत ललनसिंगच्या नावाचा उल्लेख होता.



श्रीमती सुलोचना लडवे
अमरावती मो.९३२२८०२९४६

संपूर्ण रात्र कुटुंबाने आणि त्यांच्यासमवेत शेजा-यांनी जागून काढली. दुसरे दिवसी गोंदिया पोलीस स्टेशनमधून शहरातील पोलीस स्टेशनला फोन आला. तुमच्याकडील श्वेता व प्रिया नावाच्या दोन मुली आमच्याकडे सुरक्षित आहेत. आम्ही त्यांना रेल्वेमध्ये बसवून देतो तुम्ही त्यांना आईवडीलांकडे पोहचवून द्या.

गोंदिया पोलीसांनी इत्यंभूत माहिती सदर पोलीसांना सांगितली. त्याअगोदर मुलगा चक्रधरने आसपासचा पूर्ण परिसर पिंजून काढला. पण त्याला बहिर्णींचा थांगपत्ता लागला नाही. माहितीनुसार ललनसिंगने पाहुण्यांच्या निमीत्ताने मुलींना बोलवले होते. प्रत्यक्षात त्याच्याकडे कोणतेही पाहुणे आलेले नव्हते. त्यादिवशी मुली त्याचे घरी पोहचताच तो त्यांना बडनेरा स्टेशनवरून नागपूरकडे जाणा-या गाडीत घेऊन बसला. मुलींना सगळा प्रकार लक्षात आला. त्यांनी बाबांना फोन करा असे वारंवार विनविले परंतु त्याने ब्र ही ऐकले नाही. नागपूरला गाडी थांबताच तो मुलींना घेऊन उतरला. मुलींनी रेल्वे पोलीसांशी, कुण्या व्यक्तीशी संपर्क साधण्याचा पुष्कळ प्रयत्न केला, पण त्याची कडक निगरानी मुलींवर होती.

त्याने नागपुरातील बदनाम वस्तीत मुलींना फिरवले. काही व्यक्तींसोबत तो काहीतरी व्यवहाराचं बोलतो आहे हे मुलींच्या लक्षात आले. अर्थात त्याचा मुली विकण्याचाच डाव असावा. नागपुरात काहीही काम जमत नाही म्हणून तो पुन्हा नागपुरच्या स्टेशनवर आला. मुलींनी लघुशंकेला जाण्याचे विचारताच तो

प्रसाधनाजवळ उभा राहायचा. आता तो मुलींना छत्तीसगडला जाणा-या गाडीत घेऊन बसला. जवळपास रात्री आठ वाजता गाडी गोंदिया स्टेशनवर आली. मुलींच्या मनाची कालवाकालव जास्तच वाढत होती. स्टेशन येताच श्वेताने पाणी प्यायला जाण्याचा बहाणा केला. व प्रियाला तू गाडीतच बसून राहा असे सांगितले. प्रिया गाडीत असल्यामुळे तो श्वेताच्या मागे

खाली आला नाही. रेल्वे पोलीस समोरच होते. एका पोलीसाला श्वेताने आम्हाला वाचवा, एक भामटा आम्हाला पळवून नेत आहे हे चालता चालताच सांगितले व पाणी पिऊन ती गाडीत बसली.

लगेच रेल्वे पोलीस गाडीत चढले. त्या ललनसिंग भामट्याला तिथेच बेड्या ठोकल्या. मुलींना सुरक्षितपणे सोडवून त्यांना आपल्या घरी सुरक्षित ठेवले. या सर्व प्रकारात पोलीसांना मुलींनी घडलेला सर्व प्रकार सांगितला. दुसरे दिवशी पोलीसांनी मुलींना गाडीत बसवून बडनेरा येथील पोलिसांना उतरून घेण्यास सांगितले. सर्व माहिती कळताच भाऊ चक्रधर सदर ठिकाणी उपस्थित झाला. बहीणभावाची ती भेट सर्वांच्या डोळ्यात पाणी आणणारी होती. पण या घटनेवरून कुटुंबाला आणि सर्वांनाच धडा मिळाला. कुणावरही विश्वास ठेवू नये. भावाची तडफड आणि मुलींचे प्रसंगावधान यामुळे येणारे संकट टळले. आणि तो भामटा गजाआड झाला. उत्तम संस्काराशिवाय मानलेले नाते टिकत नाही आणि कधीही रक्ताचे नाते सुटत नाही. अशी फसगत होऊ नये यासाठी प्रत्येक आईवडिलांनी लेकरांनी सदैव सतर्क राहावे.

स्वलिखीत (काल्पनिक).

***

जन्म तिचा नको असतो...!

ज्योतिर्मय साहित्य

तीची गरज, पण तिचा नकार : समाजाच्या दुटप्पी वृत्तीचा छेद ... 'स्त्री' ही या जगाच्या अस्तित्वाचा आणि सृजनाचा मूळ पाया आहे. परंतु, दुर्दैवाने आजही आपल्या समाजात तिच्या अस्तित्वाकडे एका भीषण आणि दुटप्पी दृष्टिकोनातून पाहिले जाते.

''काम भागवण्यासाठी ती हवी असते, पण जन्मासाठी मात्र तिचा नकार दिला जातो''

हे विधान केवळ काही शब्दांचा समूह नाही, तर आपल्या पुरुषप्रधान आणि तथाकथित आधुनिक समाजाच्या तोंडावर मारलेली एक सनसनाटी चपराक आहे.

मानसिकतेचा विरोधाभास : सोयीस्कर स्वीकार आणि असोयीस्कर नकार

समाजाची ही वृत्ती अत्यंत विचित्र आणि वेदनादायी आहे.

घरात स्वयंपाकघरापासून ते कौटुंबिक जबाबदाऱ्या सांभाळण्यासाठी स्त्री हवी असते.

वंशाचा दिवा पुढे नेण्यासाठी, आई होण्यासाठी स्त्री हवी असते.

पुरुषाच्या वासनेची शांतता, प्रेम आणि आनंदाची गरज भागवण्यासाठी स्त्री हवी असते.

रक्षाबंधनाला भाऊ म्हणून हातात राखी बांधण्यासाठी बहीण हवी असते आणि सण-उत्सवांत घराला घरपण आणण्यासाठी मुलगी हवी असते.

परंतु, जेव्हा हीच 'ती' एखाद्या स्त्रीच्या गर्भात जन्माला येऊ पाहते, तेव्हा मात्र समाजाचा विवेक आणि कौटुंबिक प्रेम कुठे गायब होते? तिचे गर्भातच अस्तित्व संपवण्याचे षड्यंत्र रचले जाते किंवा तिच्या जन्मावर शोक व्यक्त केला जातो.

कामाच्या, गरजेच्या आणि सोयीच्या प्रत्येक वळणावर स्त्रीचा वापर करणारा समाज, तिच्या पहिल्या श्वासाला मात्र नकाराची मोहर का लावतो?



वंशाचा दिवा : एक आंधळी आणि स्वार्थी धारणा

या दुटप्पी वृत्तीच्या मुळाशी आहे समाजातील 'वंशाचा दिवा' ही पारंपरिक, आंधळी आणि संकुचित मानसिकता. मुलगा म्हणजे म्हातारपणाची काठी आणि वंशाची ओळख, तर मुलगी म्हणजे 'दुसऱ्याचे धन' असा दुर्दैवी दृष्टिकोन अजूनही अनेक मानसांत खोलवर रुजलेला आहे.

योगिता निपाणे
अमरावती.
९८५०५३७१४२

विज्ञान आणि तंत्रज्ञान कितीही पुढे गेले, तरी माणसाची विचारसरणी आजही मध्ययुगीन मानसिकतेच्या दलदलीत अडकलेली दिसते. गर्भलिंग चाचणीवर कायद्याने बंदी असली, तरी चोरट्या मार्गाने 'तिचा' बळी देणारे हाथ अजूनही थांबलेले नाहीत. ज्या समाजात ''स्त्री ही केवळ उपभोगाची किंवा सेवा करण्याची वस्तू आहे'' ही सुप्त भावना असते, त्याच समाजात अशा प्रकारची वैचारिक विकृती जन्माला येते.

तिच्याशिवाय अस्तित्वाला काय अर्थ?

जर समाजात मुलगी जन्मालाच आली नाही, तर: उद्याची आई कुठे शोधणार?

कुटुंबाला सावरणारी, प्रेमाचा आणि वात्सल्याचा झरा असणारी पत्नी किंवा बहीण कुठून आणणार?

केवळ स्वतःच्या स्वार्थासाठी आणि काम भागवण्यासाठी स्त्रीचा वापर करायचा आणि तिच्या मूळ अस्तित्वालाच नाकारायचे, हा निसर्गाच्या नियमांशी केलेला अत्यंत भयंकर खेळ आहे.

निसर्गाने स्त्री आणि पुरुष यांना समान स्थान दिले आहे. स्त्री ही केवळ पुरुषाच्या गरजा पूर्ण करण्याचे साधन नसून, ती या विश्वाची निर्माती आहे. तिला स्वतःचे स्वतंत्र अस्तित्व, भावना, बुद्धिमत्ता आणि स्वाभिमान आहे.

बदलाची वेळ : गरज नव्हे, आदराची भावना

आज गरज आहे ती समाजाच्या या भयंकर मानसिकतेचा तिलांजली देण्याची .

स्त्रीकडे केवळ 'गरज' किंवा 'सोय' म्हणून न पाहता, एक स्वतंत्र आणि मानवी जीवन म्हणून पाहण्याची सवय आपण स्वतःला आणि पुढच्या पिढीला लावली पाहिजे.

मुलीचा जन्म ही अडचण किंवा भार नसून, तो सृजनाचा आणि भाग्याचा उत्सव मानला गेला पाहिजे.

कायदे आणि नियम तर बनतील, पण जोपर्यंत माणसाच्या मनातील 'स्त्री'विषयक दृष्टिकोन बदलत नाही, तोपर्यंत हा लढा संपणार नाही.

ज्या दिवशी समाज स्त्रीकडे तिच्या 'वापराच्या मूल्यावरून' न पाहता तिच्या 'मानवी मूल्यावरून' पाहू लागेल, त्याच दिवशी खऱ्या अर्थाने या दुटप्पी वृत्तीचा अंत होईल. तिच्या अस्तित्वाची गरज जर प्रत्येकाला आहे, तर तिच्या जन्माचा स्वीकारही तितक्याच आनंदाने आणि अभिमानाने व्हायलाच हवा!

ज्ञान संदीप शिक्षण संस्थेत डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांची जयंती वाचन प्रेरणा दिन म्हणून उत्साहात साजरी

ज्योतिर्मय साहित्य



छत्रपती संभाजीनगर – ज्ञान संदीप शिक्षण संस्था संचलित संत तुकाराम प्राथमिक विद्यालय व तुकाराम हायस्कूल, डॉ. आंबेडकर नगर, सिडको, छत्रपती संभाजीनगर येथे भारताचे माजी राष्ट्रपती, मिसाईल मॅन डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांची ९५ वी जयंती वाचन प्रेरणा दिन म्हणून उत्साहात साजरी करण्यात आली.

कार्यक्रमास संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रकाशराव सोनवणे, सचिव खिल्लारे मॅडम तसेच मुख्याध्यापक संदीप सोनवणे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते डॉ. कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पांजली अर्पण करण्यात आली. त्यानंतर विद्यार्थी व शिक्षकांनी एकत्र येऊन वाचनाची शपथ घेतली.

यानंतर विद्यार्थ्यांनी विविध उपक्रम सादर केले. समरीन खान, प्रज्ञा मिसाळ व सानिया खान यांनी डॉ. कलाम यांच्या जीवनावर आधारित भाषणे, अग्निपंख पुस्तकातील प्रेरणादायी प्रसंगांचे वाचन तसेच आवडत्या पुस्तकांचा परिचय सादर केला. या उपक्रमांना उपस्थितांनी भरभरून दाद दिली. त्यानंतर सर्व विद्यार्थिनींनी एकत्र बसून सामूहिक वाचन करत डॉ. कलाम यांना अभिवादन केले. या अभिनव उपक्रमामुळे कार्यक्रमाला विशेष रंगत आली.

संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रकाशराव सोनवणे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, रामेश्वरम येथील एका सामान्य कुटुंबात जन्मलेल्या कलामांनी लहानपणी वर्तमानपत्रे वाटून शिक्षण घेतले. जिद्द, मेहनत आणि सततच्या वाचनाच्या जोरावर ते देशाचे प्रसिद्ध शास्त्रज्ञ व राष्ट्रपती झाले. वाचनामुळे विचारांना दिशा मिळते, ज्ञान वाढते आणि व्यक्तिमत्त्व घडते, असे ते म्हणाले. मोबाईल व टीव्हीचा अतिवापर टाळून दररोज किमान अर्धा तास पुस्तक वाचण्याचे आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले.

मुख्याध्यापक संदीप सोनवणे यांनी वाचन प्रेरणा दिनाचे महत्त्व विद्यार्थ्यांना सोप्या भाषेत समजावून सांगितले. डॉ. कलाम यांना पुस्तकांविषयी विशेष प्रेम होते, म्हणून त्यांचा जन्मदिवस वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा केला जातो, असे त्यांनी स्पष्ट केले.

''स्वप्न ते नव्हे जे झोपेत पाहिले जाते, स्वप्न ते जे तुम्हाला झोपू देत नाही'' या कलामांच्या विचारांची आठवण करून देत, मोठी स्वप्ने पाहा आणि ती पूर्ण करण्यासाठी वाचन, अभ्यास व कष्ट करा, असे ते म्हणाले. शाळेच्या ग्रंथालयातील पुस्तकांचा नियमित वापर करण्यावर आणि वाचनाची सवय लावण्यावर त्यांनी विशेष भर दिला.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सुनील चौधरी, हर्षल पगारे, किरणकुमार सोनवणे, विजय पाटील, साहेबराव शिंदे, शितल घुगे, आढाव यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनुष्का मोकळे हिने प्रभावीपणे केले, तर प्रतीक्षा आव्हाड हिने उपस्थितांचे आभार मानले.

''ग्राहकांचा विश्वास हाच खरा जाहिरातदार''; साताऱ्याच्या काटदरे मसाल्यांचा लोकल टू ग्लोबल प्रवास उलगडला

पुणे पुस्तक जत्रेत ज्येष्ठ पत्रकार विनोद कुलकर्णी यांच्याशी मनमोकळा संवाद; तीन पिढ्यांच्या संघर्षाची प्रेरणादायी कहाणी

ज्योतिर्मय साहित्य

पुणे – ''समाधानी ग्राहक हाच ब्रँडचा खरा जाहिरातदार असतो. चवीतील सातत्य आणि गुणवत्तेत तडजोड न करणे हीच ग्राहकांच्या विश्वासाची गुरुकिल्ली आहे,'' असे प्रतिपादन साताऱ्याचे प्रसिद्ध उद्योजक पराग काटदरे (काटदरे मसाले) यांनी येथे केले.

न्यू इंग्लिश स्कूल, टिळक रोड येथे भरलेल्या २४ व्या 'पुणे पुस्तक जत्रेत' मराठी उद्योजकाचा लोकल टू ग्लोबल प्रवास या विषयावर त्यांच्याशी मनमोकळा संवाद साधला गेला. ज्येष्ठ पत्रकार, अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे माजी कोषाध्यक्ष आणि महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे सदस्य विनोद कुलकर्णी यांनी ही मुलाखत घेतली.

कार्यक्रमाला पराग काटदरे यांच्या पत्नी सौ. दीपा काटदरे, कन्या राधा,कुटुंबीय, नातेवाईक आणि मोठ्या संख्येने रसिक वाचक उपस्थित होते. पुणे पुस्तक जत्रेचे संयोजक पी. एन. आर. राजन आणि समन्वयक शिरीष चिटणीस यांनी या मुलाखतीचे आयोजन केले होते.

पराग काटदरे यांनी आपल्या व्यवसायाची मुळे उलगडताना सांगितले की, १९५३ मध्ये आजोबांच्या मूळ किराणा दुकानात नुकसान झाल्यानंतर आजीच्या सूचनेनुसार आणि स्वावलंबनाच्या विचारातून सातारा येथे चटणी व मसाल्यांच्या व्यवसायाची सुरुवात झाली. १९७२ मध्ये साताऱ्याच्या भाजी मंडईत दुकान सुरू करून सायकलवरून गल्लोगल्ली विक्री सुरू झाली. या काळात वडिलांनी आणि कुटुंबाने अत्यंत खडतर कष्ट घेतले. तिसऱ्या पिढीत घरगुती व्यवसायाचे रूपांतर आधुनिक एमआयडीसी () कारखान्यात आणि एका मोठ्या ब्रँडमध्ये झाले.

ब्रँड टिकवून ठेवण्यासाठीची पाच सूत्रे त्यांनी उपस्थितांसमोर मांडली. ग्राहकांचा विश्वास व समाधान हा पहिला स्तंभ असून, समाधानी ग्राहकच ब्रँडचा खरा जाहिरातदार असतो. दुसरे म्हणजे कच्चा माल पुरवणाऱ्या पुरवठादारांचे वेळेवर पेमेंट करणे. तिसरे म्हणजे आर्थिक शिस्त सर्व बँकिंग व शासकीय व्यवहार वेळेवर आणि पारदर्शक ठेवणे. चौथे म्हणजे कामगार संबंध कर्मचाऱ्यांना कुटुंबाप्रमाणे जपणे; त्यांच्या कारखान्यात ५० टक्क्यांपेक्षा जास्त महिला कर्मचारी कार्यरत आहेत. पाचवे म्हणजे दर्जा व चवीतील सातत्य, जे ग्राहकांच्या विश्वासाचे गुरुकिल्ली आहे.

ऑन-टाईम डिलिव्हरी आणि प्रचंड मागणी पूर्ण करण्यासाठी कारखान्यात आधुनिक तंत्रज्ञानाचा व मशीनरीचा वापर स्वीकारल्याचे त्यांनी सांगितले. अन्न उद्योगात जिभेची चव मुख्य असल्याने चा धोका नाही, परंतु संशोधन व विकास () आणि पॅकेजिंगसाठी तंत्रज्ञान अनिवार्य आहे. ग्राहकांच्या गरजेनुसार लहान वन-टाईम युज पॅकेट्स आणि



रेडी-टू-कुक उत्पादनांवर भर दिला जात असल्याचेही ते म्हणाले.

पुण्यात शिक्षण व नोकरीनिमित्त आलेल्या मराठी नागरिकांमुळे अमेरिका व युरोपमध्ये मसाल्यांची पहिली मागणी निर्माण झाली. कोरोनाकाळात ऑनलाईन विक्री (अमेझॉन, फ्लिपकार्ट) सुरू झाली आणि आता अमेरिकेतही थेट अमेझॉन द्वारे उत्पादने उपलब्ध आहेत. नवीन उद्योजकांना सल्ला देताना ते म्हणाले की, आंतरराष्ट्रीय बाजारात उतरताना सुरुवातीला मर्चंट एक्सपोर्टचा मार्ग निवडावा.

सध्या १०० हून अधिक उत्पादने (मसाले, चटण्या, उपवासाचे पदार्थ, इन्स्टंट मिक्स) बाजारात उपलब्ध आहेत. पुढील ५ ते १० वर्षांत ४०० ते ५०० कोटी रुपयांची उलाढाल गाठणे आणि २००० लोकांना रोजगार देण्याचे उद्दिष्ट असल्याचे त्यांनी सांगितले. खाद्यप्रक्रिया क्षेत्रात गुणवत्ता तपासणी, हायजीन, पॅकेजिंग आणि सेल्स-मार्केटिंगमध्ये रोजगाराच्या अफाट संधी असल्याचा संदेश त्यांनी तरुणांना दिला.

यावेळी बोलताना शिरीष चिटणीस म्हणाले की, २००० सालापासून राजन यांच्या मार्फत (कोविडचे २ वर्षे वगळता) पुणे पुस्तक जत्रा अविरतपणे भरवली जात आहे. यंदाच्या २४ व्या पुस्तक जत्रेत ७० हून अधिक स्टॉल्स आणि लाखो पुस्तके उपलब्ध आहेत. दररोज सकाळी ११ ते रात्री ८ या वेळेत ही जत्रा सुरू असून, दररोज विविध साहित्य-सांस्कृतिक कार्यक्रम, पुस्तकांचे प्रकाशन, परिसंवाद आणि मुलाखतीचे सत्र आयोजित केले जाते. केवळ लेखक-कवीच नव्हे, तर उद्योजक, कलाकार आणि विचारवंतांना वाचक-रसिकांसमोर आणून त्यांच्याशी संवाद साधण्याचा हा प्रयत्न आहे.

विनोद कुलकर्णी हे आरसपानी यूट्यूब चॅनेलचे प्रमुख असून त्यांचा मुलाखती घेणे हातखंडा असल्याने पराग काटदरे यांची मुलाखत खुलली.जशी कंदीपेढ्यांची ओळख साताऱ्याशी जोडलेली आहे, तशीच काटदरे मसाले ही देखील आज सातारा व महाराष्ट्राची मुख्य ओळख बनली आहे. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत शून्यातून सुरू झालेला आणि तीन पिढ्यांच्या अथक कष्टांतून उभा राहिलेला हा लोकल टू ग्लोबल प्रवास सर्वांसाठी प्रेरणादायी आहे असे मुलाखतकार विनोद कुलकर्णी म्हणाले.

मुलाखतकार विनोद कुलकर्णी हे अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे माजी कोषाध्यक्ष, ज्येष्ठ पत्रकार आणि सातारा जनता बँकेचे माजी चेअरमन आहेत. साताऱ्यात झालेल्या ९९ व्या मराठी साहित्य संमेलनाचे यशस्वी आयोजन त्यांनी केले होते असे शिरीष चिटणीस यांनी सांगितले.

आजच्या डिजिटल युगात तरुणांनी मोबाईल आणि युट्यूबचा योग्य वापर करून स्पर्धा परीक्षांमध्ये व सैन्यात यश मिळवल्याची उदाहरणे असल्याचे चिटणीस म्हणाले. बदलत्या काळानुसार उद्योगात आणि समाजात तंत्रज्ञानाचा स्वीकार करणे अनिवार्य झाले आहे असे विनोद कुलकर्णी म्हणाले.

पराग काटदरे यांनी आपल्या व्यवसायाचे गुपित, चढ-उतार आणि भावी वाटचाल यावर अत्यंत मोकळेपणाने मार्गदर्शन केले याबद्दल त्यांचे आभार मानण्यात आले. काटदरे मसाले उद्योग समूहाने पुढील काळात ४०० ते ५०० कोटी रुपयांची उलाढाल गाठण्याचे आणि २००० लोकांना रोजगार देण्याचे ठेवलेले ध्येय कौतुकास्पद असल्याचे सांगण्यात आले. व्यासपीठावर व प्रेक्षकांमध्ये उपस्थित काटदरे कुटुंबातील नवीन पिढी, नातेवाईक आणि रसिक श्रोत्यांचे मनःपूर्वक स्वागत व आभार व्यक्त करण्यात आले. पुणे पुस्तक जत्रेच्या व्यासपीठावरून अशा अनोख्या आणि प्रेरणादायी मुलाखती नेहमीच वाचकांपर्यंत पोहोचवल्या जातात, असे नमूद करून कार्यक्रमाची सांगता झाली.

यावेळी पी. एन. आर. राजन म्हणाले की, महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या सहकार्याने आणि सूचनेनुसार २००० सालापासून पुणे पुस्तक जत्रा आयोजित करण्यास सुरुवात झाली. कोरोना काळातील दोन वर्षे वगळता ही पुस्तक जत्रा सलग २४ वर्षे यशस्वीपणे भरवली जात आहे. यंदाच्या २४ व्या पुस्तक प्रदर्शनात ७० हून अधिक स्टॉल्स आणि हजारो पुस्तके वाचकांसाठी उपलब्ध करून देण्यात आली आहेत. दररोज सकाळी ११ ते रात्री ८ या वेळेत प्रदर्शन खुले असून, दररोज सकाळी ११ वाजता, दुपारी ३ वाजता आणि संध्याकाळी ५:३० वाजता विविध साहित्यिक व सांस्कृतिक उपक्रम पार पडतात.

ज्याप्रमाणे कंदीपेढी ही साताऱ्याची ओळख आहे, त्याचप्रमाणे काटदरे मसाले हा उद्योगही आज सातारा शहराची एक प्रमुख ओळख बनला आहे. काटदरे कुटुंबाने तीन पिढ्यांच्या खडतर परिश्रमांतून शून्यातून विश्व निर्माण करत साताऱ्यातील व्यवसायाचा आंतरराष्ट्रीय स्तरावर विस्तार केला आहे. या प्रेरणादायी प्रवासाची यशोगाथा पुणे शहरास केंद्रस्थानी ठेवल्यामुळे झाल्याचे पराग काटदरे यांनी स्पष्ट केले. वाचकांपर्यंत आणि श्रोत्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी उद्योजक पराग काटदरे यांचे पुणे पुस्तक जत्रेच्या व्यासपीठावर मनःपूर्वक स्वागत करण्यात आले.

> गुणवत्तेत कधीही तडजोड न करणे आणि शासकीय नियमांचे तंतोतंत पालन करणे ही मूल्ये आजही आपण पाळत असल्याचे त्यांनी सांगितले. एकदा केशर मसाला बॅचमध्ये दोष आढळल्याने १० लाख रुपयांचे नुकसान सहन करून संपूर्ण माल बाजारातून परत मागवून नष्ट केल्याचे उदाहरण त्यांनी दिले.

तरुणाई, प्रेम आणि हिंसा

ज्योतिर्मय साहित्य

मी अमरावती मधील एका विद्यापीठात साधारण महिनाभरापूर्वी रुजू झालो. त्यापूर्वी पुण्यात काम करत असल्याने तेथील वातावरण, संस्कृती आणि विद्यार्थ्यांना जवळून अनुभवण्याची संधी मिळाली. मात्र मूळचा अकोल्याचा असल्यामुळे आपले गाव, आपले शहर आणि आपला प्रांत यांच्याबद्दलची ओढ मनात सुरुवातीपासूनच होती. विकासाच्या बाबतीत तुलनेने उपेक्षित राहिलेल्या विदर्भात रोजगाराच्या संधी आणि एकूणच कामाचे वातावरण मर्यादित असल्यामुळे पुण्याला जाण्याचा निर्णय घेतला होता. पण योगायोगाने अमरावतीत एक नवी संधी चालून आली आणि घरापासूनही तुलनेने जवळ असल्यामुळे पुन्हा आपल्या प्रांतात काम करण्याची संधी मिळाली. नव्या शहरात, नव्या विद्यापीठात कामाला सुरुवात करतांना विद्यार्थ्यांच्या उत्साहाशी, त्यांच्या स्वप्नांशी परिचित होण्याची आणि स्थानिक वातावरणाशी जुळण्याची प्रक्रिया पुन्हा एकदा सुरू झाली.

मात्र नव्या शहरात, नव्या विद्यापीठात कामाला सुरुवात केल्याचा आनंद मनात असतांनाच, अवघ्या काही दिवसांच्या अंतराने समोर आलेल्या दोन घटनांनी मन अस्वस्थ करून टाकले. अमरावती मधील दोन वेगवेगळ्या महाविद्यालयांतील दोन तरुणींवर झालेल्या हल्ल्यांच्या केवळ बातम्या नव्हत्या; त्या मन हेलावून टाकणाऱ्या आणि समाजमनाला अस्वस्थ करणाऱ्या विभस्त अशा घटना होत्या. एका घटनेत तरुणीला आपला जीव गमवावा लागला, तर दुसरी तरुणी प्राणघातक हल्ल्यातून सुदैवाने बचावली. विद्यार्थ्यांच्या आजूबाजूला घडणाऱ्या या घटनांनी एक प्राध्यापक म्हणूनच नव्हे, तर एक संवेदनशील नागरिक म्हणूनही मनात अनेक प्रश्न उभे केलेआपल्या तरुणाईच्या मनात नेमकं चाललंय तरी काय? आपण आपल्या पुढच्या पिढीला फक्त शिकवत आहोत की खरोखर घडवतही आहोत?

हा प्रश्न केवळ अमरावतीपुरता मर्यादित नाही. देशाच्या विविध भागांत प्रेम, नकार, संशय, वाद, छेडछाड किंवा तथाकथित प्रतिष्ठेच्या नावाखाली तरुण-तरुणींवर होणाऱ्या हिंसक घटनांच्या बातम्या अधूनमधून समोर येत आहेत. बिहारमधील अलीकडील घटनांनीही या समस्येची आणखी एक भयावह बाजू समोर आणलीअल्पवयीन मुलगा-मुलगी




बाहेर असताना त्यांना अडवणे, मुलीचा विनयभंग करणे, मारहाण करणे आणि त्या कृत्याचे चित्रीकरण करणे. अशा घटनांकडे केवळ कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न म्हणून पाहणे पुरेसे नाही; त्यामागील सामाजिक आणि मानसिकतेच्या पैलूंकडेही पाहण्याची गरज आहे.

अमरावतीतील अलीकडील घटनांमध्ये एकतर्फी प्रेम, नकार, पूर्वीची ओळख आणि वाद यांसारखे घटक तपासात समोर आले आहेत. येथेच पहिला मूलभूत प्रश्न उभा राहतोप्रेम म्हणजे नेमके काय? प्रेम म्हणजे समोरच्या व्यक्तीवर अधिकार गाजवणे नव्हे; तर प्रेम म्हणजे तिच्या निर्णयाचा आणि स्वातंत्र्याचा आदर करणे असते. मात्र काही तरुणांच्या मनात 'ती माझ्याशी बोलते म्हणजे ती माझीच आहे', 'तिने मला नकार दिला म्हणजे माझा अपमान केला' किंवा 'ती माझी झाली नाही तर दुसऱ्याचीही होऊ नये' अशी मालकीची भावना निर्माण होतांना दिसते. प्रेमाचे रूपांतर जेव्हा मालकी हक्कात होते, तेव्हा तिथे प्रेमापेक्षा अहंकार, असुरक्षितता आणि सूडाची भावना अधिक प्रभावी ठरू शकते.

जीवनात प्रत्येकाला प्रत्येक गोष्ट मिळेलच असे नाही. प्रेमातही नाही. नकार हा अपमान नसतो; तो समोरच्या व्यक्तीचा अधिकार असतो. मात्र काही तरुण नकाराला वैयक्तिक पराभव किंवा प्रतिष्ठेचा प्रश्न मानतात. भावनिक परिपक्वता कमी असेल, तर दुःखाचे रूपांतर रागात आणि रागाचे रूपांतर सूडात होऊ शकते. म्हणूनच मुलांना फक्त 'यशस्वी कसे व्हायचे?' हे शिकवून उपयोग नाही; अपयश कसे स्वीकारायचे, नकार कसा पचवायचा, भावनिक ताण कसा हाताळायचा आणि रागावर नियंत्रण कसे ठेवायचे, हेही शिकवावे लागेल.

या संदर्भात लोकप्रिय माध्यमांचाही विचार करावा लागतो. चित्रपट किंवा वेब सिरीज मधील कन्टेन्ट हे अशा गुन्ह्यांचे थेट कारण आहेत, असे म्हणणे योग्य ठरणार नाही. कोणत्याही हिंसक कृतीमागे अनेक वैयक्तिक, सामाजिक आणि परिस्थितिजन्य घटक असू शकतात. मात्र लोकप्रिय माध्यमांचा तरुणांच्या विचारविश्वावर होणारा प्रभाव नाकारताही येत नाही. कबीर सिंग किंवाॲनिमल सारख्या चित्रपटांमध्ये 'अल्फा मेल' या संकल्पनेभोवती प्रेम, पुरुषत्व, आक्रमकता आणि मालकीची भावना ज्या पद्धतीने मांडली जाते, त्यातून काही तरुण प्रेक्षक चुकीचे संदेश आत्मसात करू शकतात. विशेषतः प्रेमात आक्रमक असणे, मुलीवर अधिकार गाजवणे, तिच्या निर्णयावर नियंत्रण ठेवणे किंवा तिचा नकार स्वीकारण्यास नकार देणे म्हणजेच 'रिअल मॅन' किंवा 'अल्फा मेल' असणे, असा गैरसमज काहींच्या मनात निर्माण



होऊ शकतो. कथानकातील अशा वर्तनाचे चिकित्सक मूल्यमापन न करता ते 'शैली', 'वृत्ती', 'मर्दानगी' किंवा 'अतूट प्रेम' म्हणून पाहिले गेले, तर प्रेम आणि पुरुषत्वाविषयीच्या चुकीच्या कल्पना अधिक दृढ होऊ शकतात. प्रेम जितके टोकाचे, तितके खरेही कल्पनाही धोकादायक आहे. प्रेमाची खोली हिंसेत नसते; ती विश्वासात, संयमात आणि स्वातंत्र्याच्या आदरात असते. प्रेम सिद्ध करण्यासाठी कुणाचा जीव घेणे म्हणजे प्रेम नव्हेती हिंसा आहे.

तरुणांमधील आलेल्या ह्या हिंसक वृत्ती बद्दल विचार करायचा झाला तर हिंसक स्वरूपाचे काही ऑनलाइन खेळांवरही विचार करायला हवा. प्रत्येक खेळ खेळणारा तरुण हिंसक होतो, असा निष्कर्ष काढणे योग्य नाही. मात्र सतत हिंसक दृश्ये, आक्रमकता आणि ऑनलाइन खेळांमधील संघर्ष यांच्या संपर्काचा व्यक्तिच्या मानसिकतेवर परिणाम होऊ शकतो. त्यामुळे पालकांनी खेळांवर सरसकट बंदी घालण्यापेक्षा खेळण्याचा वेळ, आशय आणि मुलाच्या वर्तनातील बदल याकडे सजगपणे पाहणे अधिक महत्त्वाचे आहे. डिजिटल जग असो किंवा मनोरंजनाचे माध्यममुलांनी काय पाहावे यापेक्षा ते जे पाहतात त्याचा अर्थ कसा लावतात, याबाबत संवाद अधिक आवश्यक आहे.

(क्रमशः)

पिंपळे सौदागरमधील ज्येष्ठांनी घेतला मोफत अस्थिरोग तपासणी शिबिराचा लाभ

ज्योतिर्मय साहित्य

पिंपळे सौदागर - ऑल सिनियर सिटीझन असोसिएशन आणि संचेती हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या मोफत अस्थिरोग तपासणी शिबिरात सहभाग नोंदवत परिसरातील ज्येष्ठ नागरिकांनी आरोग्याची तपासणी करुन घेतली.

बुधवार दि. १४ रोजी कोकणे चौकातील संचेती क्लिनिकमध्ये झालेल्या या शिबिरात डॉ. पराग संचेती आणि डॉ. साहिल संघवी यांच्या मार्गदर्शनाखाली सांधेदुखी, संधीवात, कंबरदुखी, हातापायांना मुंग्या येणे, सायटिका, फ्रोजन शोल्डर, टेनिस एल्बो आदी आजारांबाबत डॉ. कुशल भुरुका,



डॉ. दिप्तीश जाधव, डॉ. अमीत चौधरी, डॉ. अखिलेश गोखले, डॉ. आदिती थोरात या तज्ञ डॉक्टरांनी ज्येष्ठांची तपासणी करुन उपचारांची माहिती दिली. शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी ऑल सिनियर सिटीझन असोसिएशनचे सचिव सखाराम ढाकणे तसेच शकुंतला शिंदे, अनिल कुलकर्णी, विवेकानंद लिगाडे, रमेश वाणी, जयपाल सिदनाळे, अशोक येळंमकर, भामिनी महाले, निर्मला कासार, पद्मा गवळी, विमल मोंढेकर, शोभा राजगुरे, अशोक कलाल आणि संचेती क्लिनिकचे अजिनाथ रोठे आदिंची प्रमुख उपस्थिती होती.

वाचन प्रेरणा दिन

ज्योतिर्मय साहित्य

(मागील अंकावरून)

मनावरचा ताण कमी करण्यासाठी पुस्तकांच्या सहवासात रमले पाहिजे. चांगल्या पुस्तकांचा, विचारांचा आपल्या जीवनावर सकारात्मक परिणाम होतो आणि आयुष्याकडे पाहण्याचा आपला दृष्टकोन कायमचा बदलतो. ऐतिहासिक पुस्तकांमुळे वाचकांच्या मनात राष्ट्रनिष्ठा निर्माण होते. कथा - कादंबरी वाचनाने वाचकांच्या मनात माणुसकीचा भाव जागृत होतो. काव्य वाचनातून आपल्या मनात संवेदनशीलता निर्माण होते. थोरांची चरित्रे वाचून प्रेरणा मिळते. वर्तमानपत्रे वाचल्याने सामाजिक जाणिव निर्माण होते. पुस्तकांमुळे कमकुवत मनाला धीर मिळतो त्यामुळे निराशेच्या गर्तेत अडकलेला माणूस



हत्या, आत्महत्या करण्यापासून परावृत्त होतो. आजकालच्या मुलांना खूप ताण असतो. हा ताण कमी करण्याचे प्रभावी मध्यम म्हणजे वाचन.

एकूणच वाचनामुळे माणूस सर्वगुणसंपन्न होतो त्यांच्यात नैतिकतेची रुजवण होते. आज वाचनाअभावी समाजातील नैतिक मूल्ये हरवत चालली आहेत त्यामुळे नव्या पिढीने पुन्हा एकदा वाचन संस्कृतीकडे वळणे ही काळाची गरज आहे. आपल्या आणि समाजच्या भल्यासाठी वाचन संस्कृती टिकवायलाच हवी. वाचल तर वाचाल या उक्तीप्रमाणे तरुण पिढीला वाचवायचे असेल तर त्यांच्यात वाचन संस्कृती रुजवायलाच हवी. त्यासाठी वाचन प्रेरणा दिन यासारखे उपक्रम नक्कीच उपयोगी ठरेल.



अदम्य जिद्द

ज्योतिर्मय साहित्य

(मागील अंकावरून) सुब्बलक्ष्मी यांनी कीर्तनाचे सूर घेडले... ''एन्डारो महानुभवालू अंधारिग्गी दिनमुलू...'' या गीताचे स्वर माझ्या सर्वांगात गुंजत राहिले ताणि माझं तन-मन आनंद व समाधानानं उल्हसित झालं. या गीताचा अर्थ इतका सामर्थ्यवान होता. ते सूर कलामांच्या काळजाला भिडले आणि सुब्बलक्ष्मी यांचे चाहते बनले. १९९८ साली राष्ट्रभवन येथे सुब्बलक्ष्मी यांना भारतरत्न सम्मान सदान करण्यात आला तेव्हा कलाम त्यांच्या शेजारी बसले होते. यांनी माझ्या मस्तकावर हात ठेवून दिलेला आशीर्वाद माझ्या आयुष्यातला सर्वोत्तम क्षण आहे. भक्ती म्हणजे आपण आपल्या अंतरंगात वसलेल्या देवत्वाप्रती दर्शवतो, तो समर्पणभाव होय, संशोधकाच्या मनात वसलेली उच्च आध्यात्मिक भक्तीचे दर्शन या पुस्तकातून होते.

कलाम लिहितात, माझे माता-पिता आणि गुरुजन पांच्याखेरीज, मला स्फूर्ती देणाऱ्या व माझ्यावर प्रभाव टाकणाऱ्या आणखी पाच व्यक्ती आहेत. हे सर्व जण शास्त्रज्ञ आहेत. मी यांना महान आत्मे असं संबोधतो. या महान व्यक्तीं आहे विक्रम साराभाई - अंतरिक्षातून पृथ्वीकडे येणाऱ्या शक्तिकिरणांचे अभ्यासक व थोर वैज्ञानिक असणाऱ्या या महान व्यक्तिमत्वाने अनेक वर्षे अथक परिश्रम घेऊन भारताला सामर्थ्यवान देशांच्या पंक्तीत बसवले. दुसरी व्यक्ती प्रोः सतीश धवन बेंगलोरच्या इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स या संस्थेतील गुरू होते. धवन सरांनी देशाला, विशेषतः तरुणांना थोर नेतृत्वगुण दिला, जो गुण आपल्याला व्यवस्थापनशास्त्राच्या कुठल्याही पुस्तकात सापडणार जाही. आपल्या टीमला यशस्वीतेकडे नेलं पाहिजे ही धारणा मला जीवनभर मनात घट्ट रुजली आणि जीवनभर उपयोगी पडली. प्रो. ब्रहम प्रकाश, एम. जी. के. मेनन, डॉ. राजा रामण्णा या सर्व व्यक्तींनी तंत्रज्ञान व नवउपक्रमशील व्यवस्थापन या आयुधांच्या वापरानं भारताला बळकट करून देशाचा चेहरामोहराच बदलवून टाकला. द्रष्टा माणूस नवा देश घडवू शकतो याची प्रचीती कलामांच्या या स्फूर्तिस्थानातून मिळते हे नक्की!

या पुस्तकातील मला प्रेरित करणारा भाग म्हणजे माझे शिक्षक. या वाचनातून प्रत्येक शिक्षकाला निश्चय, निष्ठा, नीती यांचे कंकण बांधून हाती, व्रतस्थ होऊन व्यापून टाकू विश्वाच्याही मिती। ही भावना जागृत झाल्या शिवाय राहणार नाही.

कर्माचे ज्या वर्म कळले. धर्म वेगळा काय असे कष्टाने जे साध्य होते, त्या स्वयंप्रकाशी सूर्य दिसे कलाम सांगतात् उमलती मनं प्रज्वलित करणं हे शिक्षकांसमोर म्हान जीवितध्येय असतं. उमलत्या वयातील प्रज्वलित मनं पृथ्वीवरील, पृथ्वीच्या वरच्या स्तरावरील, तसंच पृथ्वीच्या गोटातील सर्वात सामर्थ्यवान साधनस्त्रोत आहे. शिक्षकाची भूमिका ही एखाद्या शिडीसारखी असते. प्रत्येक जण या शिडीचा उपयोग आपल्या जीवनात उंची गाठण्यासाठी करत असतो, पण ही शिडी मात्र आपल्या जागी घट्ट उभी असते. सापशिडीच्या खेळातल्यासारखं, ही शिडी एखादया माणसाला सापाच्या विश्वातही नेऊ शकते किंवा नशिबाच्या अमर्याद संधी असलेल्या विश्वातही नेऊ शकते. आपल्या समाजात शिक्षकी पेशाइतका समाजाच्या दृष्टीनं महत्वाचा असणारा दुसरा कोणताही पेशा नाही: बालपण हा पायाचा दगड असतो. याच पायावर अवघ्या जीवनाचा डोलारा उभा राहतो. मुलांची शिकण्याची क्षमता वाढवणारी मूल्यं त्यांच्यात रुजवणं, नवउपक्रमशील व सर्जनशील बनण्यासाठी



त्यांच्यामध्ये आत्मविश्वास निर्माण करणं

शिक्षकांच ध्येय असल पाहिजे. हे वाक्य वाचल्यानंतर उद्याचा सक्षम नागरिक तयार करण्याचे आपले व्रत जीवनभर आपण कर्तव्यदक्षतेने पुढे नेले पाहिजे याचे ज्ञान होते. केलेल्या प्रयत्नांना यश आले नाही तर पराजय नक्कीच होत नाही. पण प्रयत्नच केले नाही तर त्याहून मोठे अपयश कोणतेही नाही. आपल्या देशाला अनेक चांगले शिक्षक लाभले. डॉ. बी. आर. आंबेडकर यांच्या शिक्षकांनी तर ज्ञानाबरोबरच स्वतःचे नाव देऊन उच्चपदस्थ होण्याचा आशीर्वाद दिला. डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन शिक्षकांना सल्ला देत असत, ''आपण सदैव बौद्धिक एकात्मता व सार्वत्रिक अनुकंपा यांचा पाठपुरावा केला पाहिजे. खऱ्या गुरुमध्ये ही दोन गुणवैशिष्ट्ये असतात.'' शिक्षकाला शिकवण्याचे काम आवडत असले पाहिजे व त्याची त्याच्या या व्यवसायाशी बांधिलकी असले पाहिजे. शिक्षकांनी जीवनभर शिकत राहिले पाहिजे. विदयार्थ्यांची अशी जडणघडण केली पाहिजे की ते विदद्यार्थी स्वतंत्रपणे ज्ञानोपासना करू शकतील. अदम्य जिद्द या पुस्तकात त्यांनी आपल्यावर प्रभाव टाकणारे शिक्षक श्री शिव सुब्रमणीय अय्यर व प्रा. सतीश धवन यांच्यामुळे जीवनाला आकार कसा मिळाला हे स्पष्ट करतात. विकासाच्या टप्प्यावर अपयशाचे अनेक अडथळे उभे राहत असताना त्या अडथळ्यांवर मात कशी करायची व कार्य कस पार पाडायच हे शिकलो असे नमूद करताना शिक्षकांवर असणारी विशेष जबाबदारी म्हणजे तरूणांची मने प्रज्वलित करणे. हे सांगण्यास कलाम विसरत नाही: दि. १९-८-२००४ मध्ये श्रीनगर येथे शिक्षकांशी संवाद साधताना दिलेला संदेश प्रत्येक शिक्षकाचे आयुष्या उजळवून टाकणारा आहे. ते शब्द काळजाला असे भिडतात माझ्या सारख्या अनेकांना प्रकाशाचा एक नवा मार्ग दिसतो.

श्री. अय्यर व सतीश धवन यांच्या विषयी सांगताना म्हणतात, माझ्या आयुष्यातील या दोन्ही शिक्षकांनी मला न अत्यंत महत्वाच्या गोष्टी शिकवल्या. पहिली गुरू शिष्याला ज्ञान देतो आणि भव्यदिव्य स्वप्ने व ध्येये रुजवून शिष्याच्या जीवनाला आकार देतो. दुसरी, गुरु शिष्यांमध्ये आत्मविश्वास मिर्माण करतो आणि मी एखादी गोष्ट करू शकतो ही जिद्द शिक्षण व शिकत राहणे या प्रक्रियांद्वारे त्यांच्या मनावर बिंबवण्यास मदत करतो. मातापिता व गुरुजन यांनी एक गोष्ट समजून घेतली पाहिजे, ती म्हणजे या ग्रहावरचा आपल्यापैकी प्रत्येक जन तो किंवा ती कुणीही कुणीही असो, मानवी इतिहासातील एक पान निर्माण करत असतो. मी माझा अनुभव हा मानवी इतिहासातील सूक्ष्मबिंदू आहे असे मानतो, पण या बिंदूला जीवन आहे व प्रकाशही आहे. मात्र गुरूचे जीवन अनेक दीप उजळवते.

५-९-२००४ मध्ये नवी दिल्लीत शिक्षकांशी संवाद साधताना ते म्हणतात, शिक्षक हा कोणत्याही देशाचा कणा असतो..जणू आधारस्तंभच... या आधारस्तंभावरच सगळ्या आशा-आकांक्षा वास्तवात रूपांतरित होतात. शिक्षकवर्ग ज्ञानसंपन्न मिर्माणकर्ता असतो. या विचारांनी मी एवढे भारावले की शिक्षक



सौ शुभांगी हेमंत पांगरकर,
श्री स.भु.प्रशाला,
छत्रपती संभाजीनगर

या नात्याने विदयार्थ्यांना अधिक आस्थेने, प्रेमाने पण या विद्यार्थ्यांसाठीच आहोत अशी भूमिका प्रखरतेने निर्माण झाली आणि शेवटपर्यंत जसे कलाम शेवटच्या श्वासापर्यंत विद्यार्थ्यांसाठी कार्य करत राहिले तो प्रयत्न आपणही करावा असे मनोमनी निश्चित केले. कर्तव्यात कधी चूक केली नाही यापुढे होणार नाही राष्ट्रनिर्मितीसाठी आदर्श विदयार्थी निर्माण करण्याचा, स्वप्ने पहा उंच भरारी घेण्याचे हा मंत्र माझ्या प्रत्येक विद्यार्थ्यात निर्माण करण्याचा प्रयत्न आजन्म करत राहिल.

धाडस .... निराळा विचार करण्याचं, धाडस --- शोध लावण्याचं

धाडस ---- अशक्य गोष्टी शोधून काढण्याचं,

धाडस समस्यांवर मात करून यशस्वी होण्याचं. शिक्षकांबरोबरच भारत सन २०२० पर्यंत विकसित देश

बनविण्याच्या मोहिमेसाठी देशातील २५ वर्षांखालील वयोगटातील ३४ कोटी तरुण वर्गाला उदयाची आशा असे संबोधतात. तरुणाईने आपल्या ऊर्जेला योग्य दिशा दिली, तर ते इतकी गती करतील की, देश विकासमार्गावर वेगाने दौडेल. मुले ही आपली सर्वात मोठी संपदा आहे. स्वप्न-विचार-कृती हे तत्वज्ञान प्रत्येक विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबवायचं आहे कठोर परिश्रम व निश्चयी दीर्घ प्रयत्नांची आवश्यकता असते कोणीही आपल्याला त्यापर्यंत नेणार नाही. आपण ठरवलेले ध्येय साध्य करण्यासाठी आपणच कठोर परिश्रम घेतले पाहिजे. देशाला गरज हे, सावरकरांसारख्या देशप्रेमाची, स्वामी विवेकानंद यांना अपेक्षित वैदिक विचारशक्ती, इस्लामी शरीरसंपदा ख्रिस्ती मन असलेला भारत आजच्या तरुणाईने निर्माण केला पाहिजे. जयंत नारळीकर, रतन टाटा, पु.ल. देशपांडे या सारखे वैज्ञानिक, उदयोजक, लेखक व्हावयाचे असेल तर...

स्वप्न पहा, स्वप्न पहा,
तुमची स्वप्ने विचारांत परिवर्तित होतील,
विचारांतून कृती घडेल,
आणि तुम्ही यशस्वी व्हाल.

सर्व मुलांना स्वप्न पाहण्यासाठी प्रोत्साहन दिले तरच कीर्तिमान भारत निर्माण होईल. विदयार्थ्याने लक्षात ठेवावे अदम्य जिद्द आणि अविरत तळमळ असणाऱ्याचे नशीब स्वतः त्यास शोधत येईल. डॉ अब्दुल कलाम यांचे विचार प्रत्यक्षात आणणे हीच खरी त्यांना आदरांजली ठरेल.

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559